RNI 47034/64

# लातूर समाचार
LATUR SAMACHAR
Email-dainiklatursamachar@gmail.com

संस्थापक : स्व.शंकर माधव जडे (स्वातंत्र्य सैनिक)
कार्यकारी संपादक : शिवाजी दयानंद जडे

LATUR लातूर वर्ष ३४ वे अंक १७० वा बुधवार, दिनांक २४ सप्टेंबर २०२५ (सांज. दैनिक) पोस्ट परवाना नं. L2/RNP/OMD-52/24-26 पृष्ठे – ६ मो:९४२२४७२५०२ किंमत १ रुपया

आमच्याकडे सर्व प्रकारचे कॉम्प्युटर, नायलॉन रबरी शिक्के एका तासात तयार करून मिळतील
संपर्क
जडे ऑफसेट प्रिंटर्स
मित्र नगर, लातूर, फोन : २४२६०८



# दिवाळीपूर्वी सर्व पूरग्रस्तांना मदत मिळेल

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची ग्वाही; अधिकाऱ्यांना नियमांवर बोट न ठेवता मदत करण्याचे निर्देश

**सोलापूर/प्रतिनिधीः** अस्मानी संकटामुळे पुरत्या हैरान झालेल्या शेतकऱ्यांसह सर्वच पूरग्रस्तांना दिवाळीपूर्वी सरकारची मदत मिळेल, अशी ग्वाही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी बुधवारी येथे बोलताना दिली. त्यांनी या प्रकरणी अधिकाऱ्यांना नियमांवर बोट न ठेवता शेतकरी, शेतमजूर व सर्वसामान्य जनतेला मदत करण्याचेही निर्देश दिलेत.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस बुधवारी सोलापूरच्या दौऱ्यावर असताना ते बोलत होते. ते तेथील शेतकऱ्यांच्या बांधावर जात पूरस्थितीचा आढावा घेत आहेत. त्यांनी माढा तालुक्यातील निमगाव येथून आपल्या दौऱ्याला सुरुवात केली. तिथे पत्रकारांशी बोलताना त्यांनी सर्वच पीडित नागरिकांना दिवाळीपूर्वी सरकारची मदत मिळेल असे स्पष्ट केले. ते म्हणाले, मंगळवारीसरकारने २ हजार कोटी रुपयांचा निधी जारी केला. सरकार या संदर्भात शेतकऱ्यांना मदत करेलच. पण सोबतच ज्यांच्या घरांचे नुकसान झाले आहे, त्यांचेही नुकसान भरून दिले जाईल. अन्नधान्याचे नुकसान झालेल्यांनाही मदत केली जाईल. कोणतेही अधिकचे निकष न लावता गरजेनुसार निकष शिथील करून नागरीक केंद्रीत मदत करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. आपत्ती सुरू असताना सरकारने निधी रिलीज करणे सुरू केले आहे. त्यानुसार दिवाळीपूर्वी सर्वांना मदत मिळेल.



**ओल्या दुष्काळाचा प्रश्न डावलला!**

पत्रकारांनी यावेळी त्यांच्याकडे राज्यात ओला दुष्काळ घोषित करण्याच्या मागणीसंबंधी एक प्रश्न केला. त्यावर फडणवीसांनी मोठ्या खुबीने हा प्रश्न टोलवला. ओला दुष्काळ ही आपली बोलीभाषेतील टर्म आहे. पण पावसामुळे जे जे नुकसान झाले आहे, त्या सगळ्या नुकसानीची भरपाई आणि साधारणतः आपण टंचाईच्या परिस्थितीत शेतकऱ्यांना ज्या सवलती देतो, त्या सगळ्या सवलती द्यायचा निर्णय सरकारने घेतला आहे. त्यामुळे सगळ्या प्रकारच्या सवलती देण्यात येतील, असे ते म्हणाले.

**एनडीआरएफचा राखीव निधी वापरण्यास सुरुवात**

फडणवीस पुढे म्हणाले, सर्वप्रथम तातडीची मदत हा विषय महत्त्वाचा आहे. ही मदत शेतकऱ्यांच्या थेट खात्यात जमा केली जाईल. केंद्र सरकारही यासंबंधी राज्याला मदत करणार आहे. केंद्राने एनडीआरएफला काही आगाऊ रक्कम दिली असते. ही रक्कमही सरकारने खर्च करण्यास सुरुवात केली आहे. कालच्या मंत्रिमंडळ बैठकीतही मदतीसाठी जो काही निधी लागेल तो देण्याचे आश्वासन देण्यात आले आहे.

पत्रकारांनी यावेळी फडणवीसांचे लक्ष्य काही ठिकाणी पाणी अचानक सोडल्यामुळे पूरस्थिती उद्भवल्याकडे वेधले. त्यावर मुख्यमंत्री म्हणाले, काही ठिकाणी पाऊस ढगफुटीसारखा कोसळला. त्यामुळे पाणी नेहमीसारखे रेग्युलेट करून सोडणे शक्य झाले नाही. पण तरीही या प्रकरणी कुणाची काही चूक झाली आहे का? हे तपासले जाईल. पण पाऊसच असा झाला की, रेग्युलेट फ्लो शक्य नव्हता. अनरेग्युलेटेड कॅचमेंटमध्ये ढगफुटीसारखा पाऊस झाला. सध्या निसर्गाचे चक्र बदलल्यासारखे भासत आहे. वातावरण बदलाचा काही ठिकाणी परिणाम होत आहे. आपण याकडे लक्ष देणे गरजेचे आहे. खरडून गेलेल्या जमिनी संदर्भात काही नियम आहेत. सरकार सध्या शेतकऱ्यांना तातडीची मदत करण्यावर लक्ष केंद्रीत करण्यावर भर देत आहे, असेही मुख्यमंत्री यावेळी बोलताना म्हणाले.

## मांजरा नदीच्या पुरातील २६ व्यक्तींची सुटका





मौजे सारसा, तालुका व जिल्हा लातूर येथे मंगळचसार रात्री मांजरा नदीच्या पुरात अडकलेल्या २५ नागरिकांची बुधवारी सकाळी स्थानिक शोध व बचाव पथकाद्वारे यशस्वी सुटका करण्यात आली आहे. मौजे महापूर, तालुका व जिल्हा लातूर येथे एक वृद्ध व्यक्ती मांजरा नदीच्या पुरात अडकले होते. त्यांची स्थानिक शोध व बचाव पथकाने सुटका केली आहे.

# लातूर जिल्ह्यातील शेतकऱ्यांना राज्य शासनाचा दिलासा

## ऑगस्टमध्ये अतिवृष्टी, पुरामुळे झालेल्या नुकसानीपोटी २४४ कोटींची मदत जाहीर

**लातूर/प्रतिनिधीः** जिल्ह्यात ऑगस्ट महिन्यात अतिवृष्टी व पुरामुळे जवळपास २ लाख ८७ हजार १५१ हेक्टर क्षेत्रातील शेतपिकांचे नुकसान झाले होते. या नुकसानीचे पंचनामे करून त्याबाबतचा अहवाल शासनाला सादर करण्यात आला होता. आज राज्य शासनाने लातूर जिल्ह्यातील नुकसानग्रस्त ३ लक्ष ८० हजार ५११ शेतकऱ्यांना २४४ कोटी ३५ लक्ष रुपयांची मदत जाहीर करून दिलासा दिला आहे.

राज्य शासनाने घोषित केलेली मदतीची रक्कम डीबीटी पोर्टलद्वारे लाभार्थ्यांना थेट त्यांच्या बँक खात्यात जमा करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. तसेच नैसर्गिक आपत्तीमध्ये शेतकऱ्यांना दिलेला मदतीचा निधी बँकांनी कर्ज खात्यात अथवा अन्यथा वसुलीसाठी वळती करु नये, यासाठी जिल्हाधिकारी यांनी सर्व बँकांना आवश्यक त्या सूचना निर्गमित कराव्यात, असे निर्देशही शासनाने दिले आहेत. त्यानुसार प्रशासनाकडून तातडीने कार्यवाही केली जाणार आहे.

जिल्हा प्रशासनाने ऑगस्ट महिन्यात अतिवृष्टी व पुरामुळे जिल्ह्यातील खरीप पिकांच्या झालेल्या नुकसानीचे पंचनामे करून त्याबाबतचा अहवाल शासनाला सादर केला होता. त्यानुसार लातूर तालुक्यातील ३० हजार २६५ शेतकऱ्यांना २१ कोटी ८१ लाख ५४ हजार रुपये, औसा तालुक्यातील ४६ हजार १८३ शेतकऱ्यांना ३१ कोटी ७५ हजार ८४ हजार रुपये, रेणापूर तालुक्यातील ४५ हजार ७७८ शेतकऱ्यांना २४ कोटी ७२ लक्ष ९९ हजार रुपये, निलंगा तालुक्यातील २७ हजार ७५८ शेतकऱ्यांना २१ कोटी २१ लक्ष ४१ हजार रुपये, शिरूर अनंतपाळ तालुक्यातील २४ हजार ८७ शेतकऱ्यांना १६ कोटी १९ लाख ८ हजार रुपये, देवणी तालुक्यातील २६ हजार ९७४ शेतकऱ्यांना १८ कोटी ९९ लक्ष ४१ हजार रुपये, उदगीर तालुक्यातील ५२ हजार ७८३ शेतकऱ्यांना ३० कोटी ६९ लक्ष ४४ हजार रुपये, जळकोट तालुक्यातील २० हजार ७०० रुपये शेतकऱ्यांना १३ कोटी २६ लक्ष १७ हजार रुपये, अहमदपूर तालुक्यातील ५७ हजार ७३७ शेतकऱ्यांना ३६ कोटी ४६ लक्ष ८६ हजार रुपये आणि चाकूर तालुक्यातील ४८ हजार २४६ शेतकऱ्यांना २९ कोटी २२ लक्ष ३० हजार रुपये रुपये मदत जाहीर करण्यात आली आहे.

# सरस्वती महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना दिनानिमित्त वृक्षारोपण

**लातूर/प्रतिनिधीः** येथील सरस्वती संगीत कला महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने महाविद्यालय परिसरात प्रभारी प्राचार्य डॉ.सुदाम पवार , प्रमुख पाहुणे प्रा. रवि चव्हाण यांच्या हस्ते वृक्षारोपण करून राष्ट्रीय सेवा योजना स्थापना दिवस साजरा करण्यात आला.



या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. सुदाम पवार हे होते.तर प्रमुख पाहुणे म्हणून ग्रंथपाल प्रा.रवि चव्हाण हे होते.यावेळी राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रमाधिकारी प्रा.डॉ.बालाजी शिंदे, प्रा.डॉ.वसंत बंडे,प्रा.डॉ.राम खलंग्रे, प्रा.डॉ. संतोष कुलकर्णी,प्रा. अमोल जाधव,प्रा.ज्योती मामडगे,प्रा. डॉ.मोनालिसा खानोरकर,प्रा.श्रीमंत दोरवे,प्रा.तुकाराम येमले,श्री. विठ्ठल चव्हाण,श्री.कोंडीराम कागले,श्री.बळीराम कदम उपस्थित होते. यावेळी राष्ट्रीय सेवा योजना आणि युवकांची भूमिका या विषयावर मार्गदर्शन करताना प्रा. रवि चव्हाण म्हणाले की, तरुण पिढीच्या मनात देश प्रेमाबरोबर सामाजिक कार्याची जाणीव निर्माण व्हावी या उदात्त हेतूने २४ सप्टेंबर १९६९ रोजी राष्ट्रीय सेवा योजनेची स्थापना झाली. छजढ चए इणढ धजणया विचाराने प्रेरित होऊन अनेक महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून लाखो विद्यार्थी एकत्र येऊन समाजसेवेचे कार्य करत आहेत. वृक्ष लागवड करणे ही काळाची गरज आहे याबरोबरच त्याचे संगोपन करणे हे सुद्धा आपले आद्य कर्तव्य आहे. एन.एस.एस. च्या माध्यमातून व्यसनमुक्ती,पर्यावरण संवर्धन, स्वच्छता मोहीम, आपत्ती व्यवस्थापन, एड्स जनजागृती अशा विविध उपक्रमातून तरुणांमध्ये नवचैतन्य जागृत करण्याचे कार्य राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून घडते.असे मत त्यांनी यावेळी व्यक्त केले.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक कार्यक्रमाधिकारी प्रा.डॉ.बालाजी शिंदे यांनी केले तर उपस्थितांचे आभार प्रभारी प्राचार्य डॉ.सुदाम पवार यांनी मानले.कार्यक्रम यशस्वीतेसाठी राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वंयसेवक विद्यार्थी व विद्यार्थिनींनी परिश्रम घेऊन कार्यक्रम यशस्वी केला .

## कुजबुज

-डॉ. संजय जमदाडे



**मराठवाड्यावर निसर्ग कोपला! २२१५ कोटीची मदत जाहीर...**



**चिमटा दयाचा**

**न.प. व मनपाच्या गटारी व रस्ते पावसाने स्वच्छ केले आहेत ! पावसाची कृपा त्यांच्यावरही झाली आहे!!**

# आमदार अभिमन्यू पवारांनी केली नुकसानग्रस्त भागाची पाहणी

## संकटकाळात सरकार शेतकऱ्यांच्या खंबीरपणे पाठीशी –आ अभिमन्यू पवार

**औसा/प्रतिनिधीः** गेल्या आठवड्यापासून लातूर जिल्ह्यासह औसा विधानसभा मतदारसंघात सुरू असलेल्या अतिवृष्टीने खरीप पिकासह इतर मालमत्तेचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. झालेल्या नुकसानीचे पंचनामे प्रशासनस्तर सुरू असून या औसा विधानसभा मतदारसंघांतील नदी हत्तरगा, एकोजी मुदगड ,मदनसुरी , लिंबाळा, हसूरी, येलमवाडी,सरवडी आदी भागाची (दि.२३) सप्टेंबर रोजी आमदार अभिमन्यू पवार यांनी पाहणी केली.दरम्यान आजही बहुतांश ठिकाणी पाऊस सुरू असताना आमदार अभिमन्यू पवार यांनी भरपावसातही नुकसानीची पाहणी केली. गेल्या आठवड्यापासून सुरू असलेल्या अतिवृष्टीने शेतकऱ्यांच्या शेती पिकांचे मोठे नुकसान झाले आहे.या नुकसानीचे पंचनामे करण्याचे आदेश आमदार अभिमन्यू पवार यांनी याअगोदरच दिले असून याअगोदर तालुक्यातील किल्लारी,आलमला, उजनी या भागाची पाहणी त्यांनी केली आहे.दरम्यान या चार दिवसांत पुन्हा विविध भागांमध्ये ढगफुटीसदृश पाऊस पडला त्यामध्ये अनेक गावांचा संपर्क तुटला होता तर अतिवृष्टीमुळे काही भागात पूरपरिस्थिती निर्माण झाली आहे.मागील काही दिवसापासून लातूर जिल्ह्यासह औसा मतदारसंघात संततधार पाऊस सुरू असल्यामुळे सोयाबीन, उडीद ,मुग, तूर ,मका यासह खरीप हंगामातील सर्वच पिकाचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. अनेक शेतकऱ्यांच्या उसाचे फड आडवे पडले आहेत.या दरम्यान मंगळवारी पुन्हा आमदार अभिमन्यू पवार यांनी मतदारसंघांतील बहुतांश ठिकाणी नुकसानीची पाहणी केली.



यावेळी शेतकऱ्यांशी संवाद साधत शेतकऱ्यांच्या हातातोंडाशी आलेला घास अतिवृष्टी व पूरपरिस्थितीने हिसकावून घेतला आहे.या संकट काळात सरकार शेतकऱ्यांच्या खंबीरपणे पाठीशी उभे असून शेतकऱ्यांना मदतीची घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केली असल्याचे सांगून प्रशासनाला तातडने पंचनामे करण्याचे आदेश दिले आहेत शेतकऱ्यांनी घाबरून जाऊ नये सरकार शेतकऱ्यांच्या अडचणीच्या काळात पुर्णपणे पाठीशी असल्याचे त्यांनी सांगितले.यावेळी प्रत्यक्ष बांधावर जाऊन आमदार अभिमन्यू पवार यांनी नुकनीची पाहणी केली.

## सहकार मंत्री मा. ना.बाबासाहेब पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत नळेगाव येथे महेश बँकेची सर्वसाधारण सभा

**नळेगाव/अजगर मचकुरी** : चाकूर शहर व तालुक्यातील राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे नगरसेवक,विविध सेलचे पदाधिकारी व सर्व कार्यकर्ते यांना सविनयपूर्वक निमंत्रित करण्यात येते की, गुरुवार दि. २५ सप्टेंबर २०२५ रोजी दुपारी १.०० वाजता आपल्या सर्वांचे लाडके व लोकप्रिय नेते तथा राज्याचे सहकार मंत्री मा. ना.बाबासाहेबजी पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत नळेगाव येथे महेश अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक अहमदपूरची वार्षिक सर्वसाधारण सभा आयोजित करण्यात आली आहे. तरी चाकूर शहर व तालुक्यातील राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे नगरसेवक,पदाधिकारी व कार्यकर्ते यांनी या सर्वसाधारण सभेस उपस्थित राहावे ही विनंती केली आहे.



ओ३म् भूर्भुवः स्वः ।
तत्सवितुर्वरेण्यं भर्गो देवस्य धीमहि ।
धियो यो नः प्रचोदयात् ।।

लातूर समाचार

## संकटाचा मुकाबला करण्याचे शिक्षण असावे

निसर्गाच्या संकटावर मात करणे हे अग्निदिव्य आहे. यावर्षी पावसाने मोठे पाणी संकट निर्माण केले आहे. काही राज्यात सतत संकट येतात. दरवर्षी या बाबत मुकाबला केला जाते. जमीन खचणे, ढगफुटी होणे, उत्तर भारतात मोठ्या नद्या आहेत त्याच प्रकोप झाला तर परिसारातील भाग हा जलमय होते. पावसाने सतत मोठी संकटावर मात करणारी देशातील काही राज्य आहेत. त्यामुळे यावर दरवर्षी कोणत्याही प्रकारे मात करणे हा एकमेव पर्याय दिसून येतो. मुळात आपल्या देशात निसर्गावर कशा प्रकारे मात करावी याचे शिक्षण दिले जात नाही. सध्याला मराठवाड्यातील काही भागांत रविवारी रात्रीपासून पावसाने पुन्हा कहर केला. धाराशिव जिल्ह्यातील परंडा, बीडमधील पाटोदा, शिरूर, जालना शहर यांसह बहुतांश भागांत मुसळधार पावसाने पूरस्थिती निर्माण झाली. अनेक गावांचा संपर्क तुटला. ग्रामीण भागातील वाहतूक विस्कळीत झाली. नदी - नाल्यांना पूर आला. गेल्या २४ तासांत चार जणांचा मृत्यू झाला. तर ७२ जनावरे दगावली आहेत. ८५ महसूल मंडलात अतिवृष्टीची नोंद झाली. पिके पाण्यात गेली आहेत तर उत्तर महाराष्ट्रात जळगावमध्ये एक जण वाहून गेला. परंडा तालुक्यातील ढगपिंपरी, वडनेर या गावातून नागरिकांना बाहेर काढण्यासाठी लष्कराला पाचारण करावे लागले. सायंकाळपर्यंत २७ जणांना बाहेर काढण्यात आले तर आणखी १५० जण अडकलेले आहेत. याच तालुक्यात घरात पाणी शिरून ७० वर्षाच्या देवांगनाबाई नवनाथ वारे यांचा मृत्यू झाला. धाराशिव जिल्ह्यातील परंडा तालुक्यात पिंपळगाव येथील गोठ्यात बांधलेल्या २० गायी पुरामुळे दावणीला दगावल्या. भूम तालुक्यातील तीन गावांतील सहा कुटुंबांतील एकूण १४ जणांना पुराच्या पाण्यातून हेलिकॉप्टरद्वारे सुरक्षित बाहेर काढले. परंडा तालुक्यातील वागेगव्हाण, वडनेर आदी परिसरात अडकलेल्या नागरिकांना दिलासा देण्यासाठी राष्ट्रीय आपत्ती निवारण पथक व सैन्य दलातील जवान प्रयत्न करत होते. चांदणी, उलका, उल्फा या नद्यांना महापूर आला. रुई, दुधी, ढगपिंपरी, देवगाव (खु.), वडनेर, आवारपिंपरी, वागेगव्हाण परिसरातील नदीकाठी व वस्त्यांवर राहत असलेले अडीचशे ते तीनशेजण पाण्यात अडकल्याने या नागरिकांना सुखरूप बाहेर काढण्यासाठी प्रयत्न सुरू होते. बीडमध्ये संततधार बीड जिल्ह्यात पोटदा, आष्टीमध्ये जोरदार पाऊस झाला. बीड तालुक्यातील सात्रा-पोतरा, लंबा-रुई, शिरुर तालुक्यातील ब्रह्मनाथ येळंब, शिरपूर गात. कोळवाडी, महासांगवी, भिल्लवस्ती या गावांचा संपर्क तुटलेला आहे. या गावांतील १५ जणांना आपत्ती निवारण पथकाने सुरक्षितस्थळी हलवले. मांजरा धरणाचे दरवाजे उघडून विसर्ग वाढविण्यात आला आहे. जालना जिल्ह्यात सर्वत्र २२ सप्टेंबरच्या मध्यरात्री जोरदार अतिवृष्टी झाली. यामुळे विरेगाव येथील १४ नागरिक पुरात अडकले होते. त्यांना अग्निशमन दलाच्या जवानांच्या साहाय्याने सुरक्षित ठिकाणी हलविले. जालना तालुक्यातील सेवली मंडळात रविवारी रात्री सुमारे ६५ मि.मी. पाऊस पडला. जालना शहरातील रस्ते काही काळ पाण्यात गेले होते. जिल्ह्यातील जालना, अंबड आणि बदनापूर या तीन तालुक्यांतील दहा महसूल मंडलांत अतिवृष्टी झाली. या पावसाने जालना शहरात कुंडलिका नदीच्या पुलावरून पाणी वाहिले. अहिल्यानगर जिल्ह्याच्या दक्षिण भागाला पावसाने पुन्हा झोडपून काढले. २४ मंडलात अतिवृष्टी झाली. पाथर्डीत चोवीस तासांत ६.१ इंच (१५५ मिमी) पाऊस झाला. नगर, पाथर्डी, शेवगाव, जामखेड, श्रीगोंदा, कर्जत तालुके पुन्हा जलमय झाले आहेत. शेतीपिकांचे प्रचंड नुकसान झाले. पुरात अडकलेल्या २२७ नागरिकांची सुटका करण्यात आली. पुराचे पाणी लगतच्या वसाहतीत घुसून संसारोपयोगी साहित्याचे मोठे नुकसान झाले. घर पडून ३ जण जखमी झाले. जळगाव जिल्ह्यातील पाचोरा, भडगाव, चाळीसगाव, पारोळा, एरंडोल तालुक्यांत रविवारी रात्री आणि सोमवारी सकाळी जोरदार पाऊस झाला. पाचोरा तालुक्यातील वरखेडी येथील एका शेतकऱ्याचा नाल्यात वाहून गेल्याने मृत्यू झाला. नद्यांच्या पुराचे पाणी पाचोरा शहरासह काही गावांमध्ये शिरल्याने घरांचे तसेच पिकांचे नुकसान झाले. पंढरपूर, सोलापूर जिल्ह्यात काही ठिकाणी पावसाने अक्षरशः धुमाकूळ घातल्याचे चित्र आहे. बार्शी, माढा, माळशिरस, पंढरपूर, अक्कलकोट या ठिकाणी मुसळधार पावसाची नोंद झाली आहे. काही ठिकाणी नदी नाले, ओढे भरून वाहू लागल्याने पाणी शेतात, रस्त्यावरून वाहत आहे. यामध्ये माढा तालुक्याला पुराचे संकट आहे. या पावसाने पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. या सर्व बाबीचा विचार केला तर आता आत्मसंरक्षणाचे धडे गिरवावे लागणार आहेत कारण राज्यात काय देशात शिक्षण पद्धती ही लॉर्ड मेकाले यांनी चुकीच्या पद्धतीने लादली आहे. मुळ भारतीय शिक्षण पद्धती ही गुरुकुलीय होती. गुरुकुलात भगवान राम, योगीराज श्रीकृष्ण आदि जेवढे महापुरूष होऊन गेले. वीर पुरूष होऊन गेले. त्यांनी गुरुकुलात शिक्षण घेतले होते. हा इतिहास साक्षीला आहे. गुरुकुलीय पुर्वीची शिक्षण पद्धती व आजची शिक्षण पद्धतीचा मोठा फरक आहे. पुर्वी असे संकट येत नव्हते असे नाही. यापेक्षा मोठे संकट येत होती. जंगले होती. वाईट वृत्तीच्या लोकांचा भरणा अधिक होता. त्यात निसर्गाचे संकटही मोठे त्याच मुकाबला ते स्वत: करीत. आतासारखे बचाव पथक वगैरे नव्हते तर गुरुकुलातील प्रत्येक व्यक्ती हा नैसर्गिक संकटाशी लढणारा होता. कोणतेही संकट आले तर गुरुकुलातील विद्यार्थी हा घाबरत नव्हता असे शिक्षण दिले जात होते. अशा प्रकारच्या शिक्षणाची सध्याला मोठी गरज आहे. काही झाले तरी यापुढे बदलते हवमान, असंतुलीत वातावरणाचा परिणाम हा निसर्गावर होणारा आहे. त्यामुळे अशा नैसर्गिक संकटावर कशा प्रकारे मात करावी याचे ज्ञान शालेय अभ्यासक्रमात आगामी काळात देण्याचा विचार करणे आवश्यक आहे. काही झाले तरी आता संकटे आपल्याही राज्यात येणार आहेत यासाठी संकटाचा मुकाबला करण्यासाठी सज्ज असले पाहिजे. तसे ज्ञान सर्वांना देण्याची गरज आहे.

# दयानंद कला महाविद्यालयाच्या हिंदी विभागात नवचेतना हिंदी साहित्य मंडळाचे उद्घाटन आणि हिंदी दिवस साजरा



**लातूर/प्रतिनिधी :** १९ सप्टेंबर २०२५ रोजी लातूर येथील दयानंद कला महाविद्यालयात ''हिंदी दिवस'' मोठ्या उत्साहात आणि आनंदाने साजरा करण्यात आला. हा कार्यक्रम हिंदी भाषेचे महत्त्व, तिचा विकास आणि समकालीन समाजात तिची प्रासंगिकता यावर केंद्रित होता. हा कार्यक्रम हिंदी विभागाने आयोजित केला होता.

कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलन आणि महर्षी दयानंद सरस्वती यांच्या प्रतिमेचे पूजन करून झाली. प्रमुख पाहुण्यांचे स्वागत प्राचार्य डॉ. शिवाजी गायकवाड यांनी पुष्पगुच्छ आणि शाल देऊन केले. स्वागत भाषणात हिंदी विभागाचे प्रमुख डॉ. प्रदीप सूर्यवंशी यांनी हिंदी भाषेचे मोठेपण, अभिमान आणि वैज्ञानिक स्वरूप यावर प्रकाश टाकला.

याप्रसंगी, हिंदी विभागाने ''नवचेतना'' (हिंदी साहित्य मंडळ) स्थापनेची घोषणा केली, जे विद्यार्थ्यांना सर्जनशीलतेने व्यक्त होण्यासाठी एक शक्तिशाली व्यासपीठ प्रदान करेल. यात हिंदी चा प्रचार व प्रसार करण्यासाठी एक समिती तयार केली त्यात अध्यक्ष पदी एम ए हिंदी द्वितीय वर्षात शिकणारी मयुरी पाटील, उपाध्यक्ष पदी एम ए हिंदी प्रथम वर्षातील शेख सानिया व १२ वी ची श्रुती सूर्यवंशी यांची निवड केली सचिव पदी बी ए तृतीय वर्षातील वसंत कुलकर्णी तर सहसचिव पदी बी ए द्वितीय वर्षातील तेजस पाटोळे, कोष प्रमुख एम ए द्वितीय वर्षातील शबनम शेख आणि ११ वी तील दिक्षा साळुंके, संपर्क प्रमुख पदी १२ वी ची संस्कृति समुद्रे, बी ए प्रथम वर्षातील निलेश वाघमारे ,मीडिया प्रतिनिधी पदी बी ए प्रथम वर्षाची मिसबा शेख वा ११ वी ची स्नेहा कांबळे तर सदस्य म्हणून ज्ञानेश्वरी भिसे बी ए द्वितीय वर्ष,प्रिया धवसे बी ए तृतीय वर्ष,जीशान शेख बी ए द्वितीय वर्ष, प्रिया राठोड बी ए द्वितीय वर्ष, खांडेकर प्रदीप बी ए द्वितीय वर्ष, स्वाती जाधव बी ए प्रथम वर्ष, श्रद्धा नागराळे ११ वी, प्रणव टेंकाळे ११ वी, ओमकार कलवरे ११ वी व पायल काळे ११ वी यांची निवड करण्यात आली .

डॉ. मीना घुमे यांनी प्रमुख पाहुण्यांचा परिचय करून देण्याची जबाबदारी पार पाडली. प्रमुख पाहुणे म्हणून श्री. बजरंग पारीख (प्रसिद्ध हास्य व्यंग्य कवि, नांदेड) यांनी हिंदी भाषेच्या सद्यस्थितीवर सविस्तर व्याख्यान दिले. ते म्हणाले, ''हिंदी ही केवळ एक भाषा नाही तर आपल्या सांस्कृतिक ओळखीचे प्रतीक आहे. आजच्या युगात, तंत्रज्ञान आणि विज्ञानाच्या क्षेत्रातही आपण हिंदीला सक्षम केले पाहिजे.'' त्यांनी नवीन पिढीमध्ये हिंदी लेखन आणि साहित्यात रस कसा वाढवायचा हे देखील स्पष्ट केले.

प्राचार्य डॉ. शिवाजी गायकवाड यांनी त्यांच्या प्रेरणादायी भाषणात म्हटले की, ''हिंदी ही केवळ संवादाची भाषा नाही, तर आपल्या आत्म्याची अभिव्यक्ती आहे. ती एक माध्यम आहे ज्याद्वारे आपण आपली संस्कृती, परंपरा आणि विचार पिढ्यानपिढ्या पुढे नेतो. आजच्या तंत्रज्ञानाच्या युगात, आपण हिंदीला आधुनिक संदर्भात सादर करताना तिचे गौरव जपले पाहिजे. दयानंद कला महाविद्यालय नेहमीच भारतीय भाषा आणि परंपरांच्या जतनासाठी वचनबद्ध आहे. हिंदी दिवस आपल्याला आठवण करून देतो की हिंदी ही एक भावना आहे, भाषेपेक्षा मोठी संस्कृती आहे.''

कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी भावनिक आणि प्रेरणादायी कविता सादर केल्या. नवनिर्वाचित अध्यक्षा मयुरी पाटील ने आपले विचार व्यक्त केले.

महाविद्यालयाच्या उपप्राचार्य डॉ. अंजली जोशी, डॉ.दिलीप नागरगोजे यांची प्रमुख उपस्थिती होती तसेच हिंदी विभागाचे सर्व प्राध्यापक आणि मोठ्या संख्येने विद्यार्थी या कार्यक्रमाला उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्र संचलन डॉ. गोपाल बाहेती यांनी त्यांच्या मधुर आवाजात केले व विद्यार्थ्यांना हिंदी भाषेप्रती आपल्या कर्तव्याची शपथ दिली. आभार प्रदर्शन डॉ. शिवकांता सुरकुटे यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्रा. वर्षा कांबळे प्रा डॉ. सिरसट ,प्रा. सिद्धार्थ भालेराव, प्रा. सागर यादव तसेच कर्मचारी प्रमोद मुगळे, गोदाम व विद्यार्थ्यांचे मोलाचे सहकार्य लाभले.

हिंदी दिवस हा कार्यक्रम विद्यार्थ्यांसाठी केवळ माहितीपूर्ण नव्हता तर त्यांच्यात हिंदीबद्दल आत्मीयता आणि आदराची भावना जागृत करणारा होता. महाविद्यालयाने ''हिंदी ही एक भावना आहे, भाषेपेक्षा मोठी संस्कृती आहे'' असा संदेश दिला.

# शेतकऱ्यांचा अंत न बघता ओला दुष्काळ जाहीर करा; काँग्रेस पक्षाचे तहसीलदारांना निवेदन




**निलंगा/आयुब बागवान :** मागच्या एक महिन्यापासून दररोज मुसळधार पाऊस पडून खरीप हंगामातील पिकांचे पुर्णतः नुकसान झाले आहे. अनेकांची घरे पडली आहेत, घरात पाणी शिरुन अन्नधान्यसह घरातील वस्तूंचे मोठे नुकसान झाले आहे. नदीकाठच्या जमीनी मातीसह खरडून जाऊन त्या नापीक बनल्या आहेत. शेतकरी पुर्णतः खचून गेला असून तात्काळ त्यांना धीर देण्याची आवश्यकता आहे. सरकारने आता शेतकऱ्यांचा अंत न बघता तात्काळ निलंगा, शिरुर अनंतपाळ, देवणी सह संपूर्ण जिल्हा ओला दुष्काळ म्हणून जाहीर करावा अशी मागणी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष अभय साळुंके यांच्या नेतृत्वाखाली काँग्रेस शिष्टमंडळाने तहसीलदार यांच्या मार्फत मुख्यमंत्र्यांकडे केली.

निवेदनात तात्काळ ओला दुष्काळ जाहीर करुन उपाययोजना राबवाव्यात, मनुष्यहानी झालेल्या कुटुंबाला १० लाख रुपये मदत द्यावी, नुकसान भरपाई म्हणून कोरडवाहू एकरी ५० हजार , बागायती १ लाख व फळबागांना दिड लाख मदत द्यावी, अतिवृष्टीत वाहून गेलेले रस्ते व पूल तात्काळ दुरुस्त करावेत, गतवर्षी फुटलेले मसलगा मध्यम प्रकल्प व हाडगा लघू प्रकल्पाच्या दुरुस्तीचे काम मार्गी लावावे आदी मागण्यांचा समावेश निवेदनात करण्यात आला आहे. दोन दिवसात सरकारने दखल घेतली नाही तर दि २५ सप्टेंबर रोजी निलंगा येथील छत्रपती शिवाजी महाराज चौकात काँग्रेसच्या वतीने रास्तारोको आंदोलन करण्यात येईल असा इशारा देण्यात आला. निवेदन देताना अजित माने, विजयकुमार पाटील, सुधाकर पाटील, पंकज शेळके, आंबादास जाधव, रमेश मदरसे, विठ्ठल जाधव, हाजी सराफ, किशोर कारखाने, सलीम पठाण, शंकर क्षिरसागर, शकील पटेल, गोविंद सुर्यवंशी, धनाजी चांदूर आदी उपस्थित होते.

**काँग्रेसकडून नुकसानग्रस्त भागाची पाहणी**

सततच्या पावसाने नुकसान झालेल्या भागाची काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष अभय साळुंके यांनी शिष्टमंडळासह पाहणी करून शेतकऱ्यांची संवाद साधला. तालुक्यातील झरी, काटेजवळगा, अंबुलगा (बु), बोटकुळ, सावरी, सोनखेड, जामगा या ठिकाणी प्रत्यक्ष शेतात जाऊन नुकसानीची पाहणी करून शेतकऱ्यांना न्याय मिळवून देण्यासाठी काँग्रेस आपल्या सोबत आहे. वेळप्रसंगी रस्त्यावर उतरून लढा उभारु आपण धीर सोडू नका असे आवाहन त्यांनी शेतकऱ्यांना केले. तत्पूर्वी काटेजवळगा येथील वैजनाथ श्रीपती राजमाने यांच्या घरी भेट देऊन राजमाने कुटुंबाचे सांत्वन करत सरकारने या कुटुंबाला दहा लाख रुपये मदत व तात्काळ घरकुल मंजूर करून द्यावे अशी अशी मागणी साळुंके यांनी प्रशासनाकडे केली. यावेळी डॉ अरविंद भातांब्रे, अजित माने, विजयकुमार पाटील, ॲड नारायण सोमवंशी, बालाजी गोमसाळे, आंबादास जाधव, सुधाकर पाटील, शकील पटेल, विठ्ठल पाटील, पंकज शेळके, अपराजित मरगणे आदी उपस्थित होते.

# प्रा .डॉ. तरंगे सरांचे श्री कोचिंग क्लासेस, निलंगा-लातूर विविध पुरस्काराने सन्मानित



**निलंगा/आयुब बागवान :** निलंगा जिल्हा-लातूर येथील प्रा. डॉ. तरंगे सरांच्या शैक्षणिक क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याचा विविध संस्थांमार्फत सन्मान करण्यात आला.प्रा. डॉ. गजेंद्र तरंगे सरांच्या श्री कोचिंग क्लासेस निलंगा-लातूर ला महाराष्ट्र उद्योजक अवॉर्ड २०२५ द्वारे Outstanding Contribution to online education in Maharashtra या पुरस्काराने सुप्रसिद्ध अभिनेत्री वर्षा उसगावकर यांच्या हस्ते पुणे येथील कार्यक्रमात सन्मानित करण्यात आले.

Ajinkya D.Y.Patil University Ûmao Coaching Class Excellence Award 2025 हा पुरस्कार प्रदान करण्यात आला.तसेच भारत न्यूज नेटवर्क द्वारे भारत सन्मान अवॉर्ड २०२५ ने गौरव करण्यात आला.मागील २५-वर्षांपासून प्रा .डॉ. गजेंद्र तरंगे सरांनी श्री कोचिंग क्लासेस निलंगा-लातूर च्या माध्यमातून हजारो विध्यार्थ्यांना शिक्षण देऊन उच्च पदापर्यंत पोहचवले आहेत. कोरोना काळापासून त्यांनी ऑनलाईन एज्युकेशन क्षेत्रातही आपला वेगळा ठसा उमटवला आहे.

आजही ऑनलाईन क्लासद्वारे संपूर्ण ३६-जिल्ह्यामध्ये ३ री ते १२ वी तसेच एमपीएससी, सरळसेवा, तलाठी, पोलीस, आरोग्य भरती व ढएढ (शिक्षक पात्रता परीक्षा) चे वीस हजार पेक्षा जास्त विद्यार्थी सरांचे अँप द्वारे ऑनलाईन शिक्षण घेत आहेत.

प्रत्येक गावापर्यंत, वाडी-वस्ती, तांड्यापर्यंत सरांनी अगदी माफक दरात शिक्षण उपलब्ध करून दिले आहे. यासोबतच १०० पेक्षा जास्त युवकांना सरांनी रोजगार उपलब्ध करून दिला आहे. एकही विद्यार्थी शिक्षणापासून वंचित राहू नये हा एकमेव उद्देश ठेवून प्रा डॉ.गजेंद्र तरंगे सरांचे शैक्षणिक क्षेत्रात अहोरात्र कार्य सुरू आहे.

# राष्ट्रीय विरामचिन्ह दिन : लेखनातील स्पष्टता आणि अचूकतेची ओळख

लेखन हे मानवाच्या संवादाचे सर्वात मौलिक माध्यम आहे. शब्दांच्या योग्य निवडीसह वाक्यांचे संरचनात्मक संगठन केवळ विचार मांडण्यासाठीच नाही तर वाचकाला स्पष्ट संदेश पोहचवण्यासाठीही अत्यावश्यक ठरते. या संदर्भात विरामचिन्हांचे स्थान अत्यंत महत्त्वाचे आहे. विरामचिन्हे, जसे की पूर्णविराम, अल्पविराम, प्रश्नचिन्ह, उद्गारवाचकचिन्ह, कोष्टक, उधृतचिन्ह इत्यादी, ही शब्दांच्या समूहाला अर्थपूर्ण करतात. या चिन्हांचा अचूक आणि योग्य वापर केल्यास वाक्याचा अर्थ स्पष्ट होतो, विचार अधिक प्रभावी पद्धतीने मांडता येतो, आणि लेखन वाचकास समजण्यास अधिक सुलभ होते. विरामचिन्हांच्या योग्य वापराविना लेखन अधुरे, असंबद्ध किंवा गोंधळात टाकणारे ठरते. उदा. '' , !' आणि '' !' या दोन वाक्यांमध्ये फक्त एका अल्पविरामाच्या बदलामुळे अर्थ पूर्णपणे बदलतो. पहिल्या वाक्यात आपण ''आजीला खाऊ घालूया'' असा अर्थ व्यक्त करतो, तर दुसऱ्या वाक्यात ''आजीला खाऊन टाकूया'' असा गंभीर अर्थ बनतो. या उदाहरणातून स्पष्ट होते की विरामचिन्हे केवळ शब्दांच्या अलंकारासाठी नाही, तर वाचनाच्या अर्थपूर्णतेसाठीही अत्यंत गरजेची आहेत.

**विरामचिन्ह दिनाची उत्पत्ती आणि उद्दिष्ट**

राष्ट्रीय विरामचिन्ह दिनाची संकल्पना २००४ साली अमेरिकेतील लेखक आणि अर्थतज्ज्ञ जेफ रुबिन यांनी मांडली. त्यांनी लक्षात आणून दिले की, लेखनाच्या गुणवत्तेत सुधारणा आणण्यासाठी आणि वाचकांना विचारांची स्पष्टता प्रदान करण्यासाठी विरामचिन्हांचे महत्त्व पटवणे गरजेचे आहे. या दिवसाचे उद्दिष्ट फक्त लेखनातील चुका कमी करणे नाही, तर समाजातील सर्व वयोगटातील लोकांना विरामचिन्हांचा योग्य वापर शिकवणे, लेखन कौशल्य सुधारणा करणे, आणि संवाद अधिक प्रभावी बनवणे आहे. हा दिवस औपचारिकरित्या दरवर्षी २४ सप्टेंबर रोजी साजरा केला जातो. शाळांमध्ये आणि विद्यापीठांमध्ये विविध स्पर्धा, कार्यशाळा, चर्चासत्रे आणि मार्गदर्शन कार्यक्रम आयोजित केले जातात, ज्यामध्ये विद्यार्थी, शिक्षक, लेखक आणि भाषाप्रेमी सहभागी होतात. यामुळे विद्यार्थ्यांना विरामचिन्हांच्या योग्य वापराची सवय लागते आणि त्यांच्या लेखनात सुधारणा होते.

**विरामचिन्हांचे प्रकार आणि उपयोग**

विरामचिन्हांचा अभ्यास करताना त्यांच्या प्रकार आणि उपयोग समजणे महत्त्वाचे ठरते. पूर्णविराम वाक्याच्या समाप्तीसाठी वापरला जातो आणि वाक्याला संपूर्णता प्रदान करतो. अल्पविराम शब्दांच्या यादीतील विभागणीसाठी, वाक्यातील विचार वेगळे करण्यासाठी किंवा वाक्याचे प्रवाह सुलभ करण्यासाठी वापरला जातो. प्रश्नचिन्ह प्रश्न विचारताना वापरले जाते, जे वाचकाला थेट संवादात सहभागी होण्याची संधी देते. उद्गारवाचकचिन्ह भावनिक अभिव्यक्तीसाठी उपयुक्त असते, जसे की आश्चर्य, आनंद, राग किंवा उत्साह व्यक्त करताना ते वाफारले जाते. कोष्टक अतिरिक्त माहिती देण्यासाठी, स्पष्टीकरण किंवा उदाहरण मांडण्यासाठी वापरले जाते. उधृतचिन्ह मुख्यत्वे इतरांचे विचार, भाषण किंवा लेखन उद्धृत करताना वापरले जाते, तर कोलन व सेमीकोलन सूचीत केलेल्या सूची किंवा संबंधित विचार जोडण्यासाठी उपयुक्त ठरतात. या विविध चिन्हांचा योग्य उपयोग लेखनाच्या स्पष्टतेसाठी अत्यावश्यक आहे.

**शैक्षणिक दृष्टीकोन**

भारतामधील शैक्षणिक व्यवस्थेतही हा दिवस साजरा केला जाऊ लागला आहे. शाळांमध्ये विद्यार्थ्यांना लेखन कार्यात सामील करून घेऊन त्यांना विरामचिन्हांच्या योग्य वापराचे महत्त्व पटवले जाते. विविध स्पर्धा, जसे की ''विरामचिन्हांचा योग्य वापर करून कथा लिहिणे,'' ''उद्गारवाचकचिन्हांच्या वापरावर आधारित निबंध लेखन,'' ''प्रश्नचिन्हाद्वारे संवाद लेखन'' इत्यादी आयोजित केले जातात. यामुळे विद्यार्थ्यांमध्ये लेखनातील अचूकतेची जाणीव निर्माण होते, त्यांची कल्पकता वाढते, आणि त्यांच्या लेखनात सुधारणा केली जाते. शिक्षणाच्या प्रारंभीच योग्य लेखनसवयी विकसित झाल्यास, भविष्यात व्यावसायिक तसेच सामाजिक संवादात त्याचा फायदा होतो.

**सामाजिक दृष्टीकोन**

विरामचिन्हांचा योग्य वापर केल्यास समाजात संवाद अधिक स्पष्ट होतो. पत्रव्यवहार, ईमेल, डिजिटल संवाद, सोशल मीडिया पोस्ट, ब्लॉग्स आणि विविध लेखांमध्ये विरामचिन्हांचा योग्य वापर आवश्यक आहे. चुकीच्या विरामचिन्हांचा वापर कधी कधी गोंधळ निर्माण करतो, गैरसमज वाढवतो आणि संवादाचा अर्थ बदलू शकतो. समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून विचार केला तर, स्पष्ट लेखन हे सामाजिक संवाद सुधारण्याचे साधन बनते, कारण व्यक्ती आपले विचार प्रभावी पद्धतीने मांडू शकते, गैरसमज कमी होतात, आणि समाजातील विविध घटकांमध्ये समन्वय वाढतो.

**व्यावसायिक आणि डिजिटल जीवनातील महत्त्व**

विरामचिन्हांचा अचूक वापर व्यावसायिक जीवनात अत्यंत महत्त्वाचा ठरतो. रिपोर्ट, प्रोजेक्ट दस्तऐवज, ईमेल, औपचारिक पत्रव्यवहार, प्रेझेंटेशनसह इतर व्यावसायिक संवादात विरामचिन्हांचा योग्य वापर केल्याने व्यक्तिमत्व अधिक प्रभावी बनते. हे कौशल्य व्यावसायिक वातावरणात विश्वासार्हता निर्माण करते आणि संदेश अधिक स्पष्टपणे पोहचतो. डिजिटल युगात, जिथे सोशल मीडिया, ब्लॉग, ईमेल्स आणि ऑनलाईन लेखन प्रचंड प्रमाणात आहेत, तिथे विरामचिन्हांचा योग्य वापर लेखनाची गुणवत्ता आणि प्रभावशीलता सुनिश्चित करतो.

**लेखनातील सौंदर्य आणि रचनात्मकता**

विरामचिन्हांचा अभ्यास केवळ व्याकरण शिकण्यापुरता मर्यादित नाही. लेखनातील सौंदर्य, रचनात्मकता, संवादाची प्रभावशीलता आणि वाचकास अर्थ समजावून देण्याची क्षमता या सर्व पैलूंमध्ये सुधारणा घडवून आणते. योग्य विरामचिन्हांचा वापर कथानक, निबंध, संवाद, कवितांमध्ये स्पष्टता आणि अभिव्यक्तीशैली अधिक प्रभावी बनवतो. लेखक किंवा विद्यार्थी जेव्हा योग्य विरामचिन्हांचा वापर करतो, तेव्हा त्यांच्या लेखनात एक नवीन जीवन, प्रवाह, आणि स्पष्टता निर्माण होते.



**राष्ट्रीय विरामचिन्ह दिनाचा महत्त्वाचा संदेश**

राष्ट्रीय विरामचिन्ह दिन हा फक्त एक औपचारिक स्मरण दिन नाही, तर लेखनातील अचूकतेची आणि स्पष्टतेची जाणीव करून देणारा महत्त्वपूर्ण उपक्रम आहे. या दिवशी आपण सर्वांनी आपल्या लेखनातील चुका शोधून त्यात सुधारणा करणे, विरामचिन्हांचा योग्य वापर करून विचार स्पष्ट करणे, आणि संवाद अधिक प्रभावी बनवणे हाच मुख्य उद्देश ठेवावा. हा दिवस शिक्षणसंस्था, भाषाप्रेमी, लेखक, पत्रकार, विद्यार्थ्यांसाठी लेखनाची गुणवत्ता वाढविण्याचा आणि संवाद साधण्याचा सुवर्णसंधी ठरतो. विरामचिन्हांचा अभ्यास, त्यांच्या प्रकारांचा योग्य वापर, आणि लेखनातील स्पष्टता यावर लक्ष केंद्रित करून साजरा केला जाणारा राष्ट्रीय विरामचिन्ह दिन हे एक शैक्षणिक, व्यावसायिक आणि सामाजिक दृष्ट्या उपयुक्त उपक्रम आहे. लेखनात सुधारणा, संवादाची स्पष्टता, विचारांची अचूक मांडणी आणि वाचन सुलभता या सर्व पैलूंमध्ये सुधारणा घडवून आणण्यासाठी या दिवसाचे महत्त्व ओळखणे आवश्यक आहे.

अशा प्रकारे, राष्ट्रीय विरामचिन्ह दिन, लेखनातील अचूकता, स्पष्टता आणि प्रभावी संवाद यांचा उत्सव आहे. लेखनातील विरामचिन्हांचा योग्य वापर शिकणे आणि तो आपल्या दैनंदिन जीवनात लागू करणे, या दिवसाचे मुख्य उद्दिष्ट आहे. त्यामुळे आपण सर्वांनी या दिवशी लेखनाच्या या महत्वपूर्ण पैलूंचे महत्त्व लक्षात घेऊन, विरामचिन्हांचा योग्य वापर करण्याचा संकल्प करावा आणि आपल्या लेखन कौशल्यात सुधारणा घडवावी.

**डॉ. राजेंद्र बगाटे**
(लेखक, समाजशास्त्राचे अभ्यासक आहेत)
मो. क्र. ९९६०१०३५८२

# उपवासाला भगर खाताय तर...

नांदेड : उपवासाला मोठ्या प्रमाणात भगरीचे सेवन केले जाते. भगर खाल्ल्यामुळे अन्न विषबाधा झाल्याच्या अनेक घटना महाराष्ट्रात व नांदेड जिल्ह्यात यापूर्वी घडल्या आहेत. भगरीवर मोठ्या प्रमाणात अस्परजिलस प्रजातीच्या बूरशीचा प्रादुर्भाव होतो. ज्यामुळे फ्युमिगाक्लेविन यासारखी विषद्रव्ये तयार होतात. पावसाळयातील वातावरण बूरशीच्या वाढीसाठी अनूकुल असते, अशी बूरशीचा प्रादुर्भाव झालेली भगर खाण्यात आल्यास अन्न विषबाधा होऊ शकते. त्यामुळे नागरिकांनी उपव-ासाला भगर खाताना काळजी घ्यावी, असे आवाहन जिल्हा प्रशासनाच्यावतीने करण्यात आले आहे. बाजारातून भगर आणल्यानंतर ती निवडून स्वच्छ करा. शक्यतोवर पाकीटबंद भगर घ्या. ब्रँड नाव नसलेली किंवा लेबल नसलेली भगर पाकीटे व सूटी भगर घेऊ नका. भगर घेतांना पाकीटावरचा पॅकींग दिनांक व अंतिम वापर दिनांक तपासा. भगर साठवताना ती स्वच्छ कोरड्या ठिकाणी, व्यवस्थित झाकण बंद डब्यात ठेवा, जेणेकरून वातावरणा-



तील ओलाव्यामुळे बूरशीची वाढ होणार नाही. जास्त दिवस भगर साठवू नका. जास्त दिवस साठवलेली भगर खाऊ नका. शक्यतोवर भगरीचे पीठ विकत आणू नका. भगरीच्या पिठामध्ये वातावरणातील ओल-ावा शोषून घेण्याची क्षमता अधिक असते. त्यामूळे पिठाला बूरशीची लागण होण्याची शक्यता जास्त असते. भगरीच्या दशम्या किंवा भाकरी खाण्याऐवजी खिचडी खावी. भगरीचे पीठ आवश्यक असेल तेवढेच दळून घ्या. जास्त दिवस पीठ साठवू नका. बाहेरुन दळून आणण्यापेक्षा घरीच दळा.

भगर आणि शेंगदाणे हे अधिक प्रथिनयुक्त पदार्थ आहेत. दोन ते तिन दिवस सलग उपवास असताना या पदार्थांचे सेवन सिडीटी वाढण्यास कारणीभूत ठरते. त्यामुळे उलटी, मळमळ व पोटाचे त्रास होतात. या पदार्थांचे सेवन पचनशक्ती नुसार मर्यादितच करावे. भगरीचे सेवन करतांना या गोष्टी लक्षात ठेवा. म्हणजे संभाव्य अपाय टाळता येईल. विक्रेत्यांनी पॅकबंद भगरचीच विक्री करावी. भगर खरेदी करतांना घाऊक विक्रेत्याकडून पावती घ्यावी. भगरीचे पॅकेट, पोत्यावर उत्पादकांचा पत्ता, परवाना क्र., पॅकींग दिनांक, अंतिम वापर दिनांक असल्याची खात्री करून घ्या. मुदतबाह्य भगर किंवा भगर पिठाची विक्री करु नये. सुटी भगर व खुले भगर पीठ शक्यतो विक्रीसाठी ठेऊ नये. अन्न व औषध प्रशासनाचेवतीने भगर विक्री करणाऱ्या दुकानांची तप-ासणी करण्यात येत आहे. नियमाचे उल्लंघन करणाऱ्या विक्रेत्यांवर अन्न सुरक्षा व मानके कायदा २००६ अंतर्गत कारवाई करण्यात येईल येईल असे निवासी उपजिल्हाधिकारी किरण अंबेकर यांनी सांगितले आहे.

# शांत आणि गाढ झोपेसाठी ...

मुंबई : आजच्या धावपळीच्या जीवनात पुरेशी आणि शांत झोप मिळवणे अनेक लोकांसाठी एक आव्हान बनले आहे. निद्रानाश (खपीपळर) ही एक गंभीर समस्या बनली आहे, जी शारीरिक आणि मानसिक आरोग्यावर नकारात्मक परिणाम करते. जर तुम्हाला रात्री शांत आणि गाढ झोप हवी असेल, तर काही सोप्या युक्त्या तुम्हाला मदत करू शकतात. १. झोपेचे नियमित वेळापत्रक पाळा दररोज एकाच वेळी झोपायला जाणे आणि उठणे महत्त्वाचे आहे. यामुळे शरीराची 'बायोलॉजिकल क्लॉक' नियमित राहते, जी गाढ झोपेसाठी आवश्यक आहे. सुट्टीच्या दिवशीही हे वेळापत्रक पाळण्याचा प्रयत्न करा. २. झोपण्यापूर्वी स्क्रीनपासून दूर राहा मोबाईल फोन, टॅब्लेट, लॅपटॉप आणि टीव्ही यांसारख्या उपकरणांमधून निघणारा निळा प्रकाश (ब्लू लाईट) मेंदूतील मेलाटोनिन नावाच्या हार्मोनचे उत्पादन थांबवतो, जो झोपेसाठी आवश्यक आहे. त्यामुळे झोपण्यापूर्वी किमान एक तास आधी ही उपकरणे वापरणे टाळा. ३. आरामदायक वातावरण तयार करा झोपण्यासाठी खोली शांत, थंड आणि अंधारी असावी. आरामदायक गादी आणि उशीचा वापर करा. यामुळे झोपेची गुणवत्ता सुधारते. ४. झोपण्यापूर्वी हलका आहार घ्या झोपण्यापूर्वी जड आणि मसालेदार पदार्थ खाणे टाळा. रात्रीच्या जेवणानंतर लगेच झोपायला जाऊ नका. त्याऐवजी, एक ग्लास गरम दूध किंवा हर्बल चहा घेणे फायदेशीर ठरू शकते. ५. दिवसा झोप घेणे टाळा जर तुम्हाला रात्री चांगली झोप हवी ७. ध्यान आणि योगअसेल, तर दिवसा झोपणे टाळा. आवश्यक असल्यास, २०-३० मिनिटांची छोटी डुलकी घेऊ शकता. ६. व्यायाम करा नियमित व्यायाम करणे झोपेची गुणवत्ता सुधारते. परंतु, झोपण्याच्या वेळेच्या अगदी जवळ व्यायाम करू नका, कारण यामुळे शरीरातील ऊर्जा वाढते आणि झोप येणे कठीण होते. झोपण्यापूर्वी काही वेळ ध्यान आणि योग केल्याने मन शांत होते. यामुळे तणाव कमी होतो आणि झोप लवकर येते. या सोप्या युक्त्या वापरून तुम्ही तुमच्या झोपेची गुणवत्ता सुधारू शकता आणि एक निरोगी जीवनशैली जगू शकता.



# महाराष्ट्रात महाप्रलय

महाराष्ट्रावर महाप्रलयाचं संकट आलं आहे. नेहमीपेक्षा थोडा लवकरच सुरू झालेला पाऊस नवरात्रीतही आषाढासारखा कोसळतो आहे. अहिल्यानगरच्या दक्षिण भागापासून मराठवाड्याला कवेत घेत या पावसाने अर्ध्या विदर्भालाही अक्षरशः झोडपून काढलं आहे. सोलापूर आणि जळगाव जिल्ह्याचा काही भागही या पावसाच्या तडाख्यात सापडला आहे. जेमतेम पर्जन्यमानाच्या या प्रदेशाला कोकणापेक्षा अधिक मुसळधार पाऊस सोसणं कठीण आहे. पावसाच्या दीर्घकाळ आणि काही ठिकाणी ढगफुटीसारख्या कोसळण्याने या भागातील जनजीवन पूर्ण उद्ध्वस्त झालं आहे. विशेषतः शेतीचं झालेलं नुकसान अपरिमित आहे. महाराष्ट्राला मे महिन्यापासून पावसाचे चातकापेक्षाही जास्त वेध लागतात. अनेक ठिकाणी पाणीटंचाई जाणवू लागते. टँकरने होणारा पाणीपुरवठाही अपुरा पडू लागतो. माणसांना स्वतः च्या गरजा आणि पाळीव जनावरांच्या पाण्याच्या गरजा कशा भागवायच्या असा प्रश्न सतावत असतो. त्यामुळे, एकदा पाऊस सुरू झाला, की निम्मा महाराष्ट्र सुटकेचा निःश्वास टाकत असतो. राज्याचा त्यापेक्षा अधिक भाग पावसाने धरणं भरावी, तळी-विहिरी भराव्यात एवढीच माफक अपेक्षा ठेवून असतो. यावर्षी अनेक ठिकाणी ऑगस्ट महिन्याच्या सुरुवातीलाच पाणी चांगलं भरलं. जलाशय तुडुंब झाल्याने ग्रामीण भागात समाधान पसरलं. लोक उत्साहात होते. पण, ऑगस्टच्या शेवटापासून पावसाने आणखी जोर धरला तेव्हाच निम्म्या




महाराष्ट्राचे धाबे दणाणले. नंतरच्या पावसाने शेतीचं, फळबागांचं नुकसान सुरू केलं. मराठवाड्यात आणि उत्तर महाराष्ट्रातील जळगाव जिल्ह्यात याच काळात ढगफुटीसदृश पाऊस झाला.

परतीचा पाऊस जाता जाता दोन-चार ठिकाणी तडाखा देत असतोच. तसा इतिहास आहे. त्यामुळे, ऑगस्ट महिन्याच्या अखेरीला झालेलं नुकसान तिथेच थांबेल, अशी अटकळ होती. पण, प्रत्यक्षात पावसाचा जोर आणखी वाढला. सप्टेंबरचा दु-सरा पंधरवडा उलटूनही पावसाचा जोर कमी होत नाही, हे लक्षात आलं, तेव्हाच जाणकारांना या वर्षीच्या महाराष्ट्रावरच्या संकटाची चाहूल ला-गली. अहिल्यानगरच्या दक्षिण भागातल्या दुष्काळी पट्ट्यातही असा पाऊस झाला, की गावंच्या गावं पुराने वेढली गेली. चारचाकी गाड्या वाहून जातील, एवढ्या वेगाने पाण्याचे प्रवाह ऐन गावांतून वाहत होते. गेल्या दोन दिवसांत पावसाचा हाच जोर सर्वदूर पसरला आहे. महाराष्ट्राचे अनेक जिल्हे आणि त्यातील अनेक तालुके अक्षरशः पाण्यात बुडाले आहेत.महाराष्ट्रात यापूर्वीही पूर आले, महापूर आले. पण, अनेक जिल्ह्यांत एकाचवेळी रबरी बोटी आणि लष्कराच्या हेलिकॉप्टरच्या मदतीने ग्रामस्थांची, नागरिकांची सुटका करण्याची वेळ आली नव्ह-ती. ती यावेळी आली आहे. या महाप्रलयाला 'महा' का म्हटलं, ते यावरून लक्षात येईल. या पावसाळ्यात हिमालयात अनेक ठिकाणी ढगफुटी झाल्या. पर्वताचे मोठे भाग ढासळले. गावंच्या गावं वाहून गेली. पंजाबातही ३० जणांचा बळी घेऊन पावसाने आपला रुद्रावतार दाखवला. पण, महाराष्ट्रात पठारी भागात पावसाने सातत्याने आपलं तांडव चालवलं असल्याने या भागातल्या उभ्या पिकांचं, फळबागांचं, शेतजमिनींचं, गाईगुरांचं आणि लोकांच्या निवाऱ्यांचं मोठं नुकसान झालं आहे. पावसाने गावंच्या गावं साफ केली आहेत. त्यांच्या पुनर्वसनासाठी सरकारला मोठी मदत करावी लागणार आहे. सुदैवाने या संकटाची चाहूल आधीच लागली असल्याने सरकारची यंत्रणाही बऱ्यापैकी तयारीत आहे. मंत्रिमंडळाच्या कालच्या बैठकीत त्यामुळे परिस्थितीचा आढावा घेऊन मदतीची प्राथमिक घो-षणा झाली, ती दिलासादायक आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पूरग्रस्तांना दिलेला दिलासाही खूपच आश्वासक ठरला आहे.

आपत्तीग्रस्त परिस्थितीचा पूर्ण आढावा घेऊन सर्व पंचनामे झाल्यानंतर एकत्रित मदत करण्याची पद्धत आतापर्यंत होती. यावेळी मात्र परिस्थितीनुसार जसजसे पंचनामे होत जातील, त्या त्या ठिकाणी त्यानुसार मदत पोहोचवण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला, ही फार चांगली गोष्ट झाली. त्यामुळे, मदत लवकर पोहोचेल आणि पुनर्वसनालाही लवकर सुरुवात होईल. धोका एवढाच, की यामुळे पंचनाम्यांबाबतच्या तक्रारी दीर्घकाळ सुरू राहतील. त्या राहूच नयेत, यादृष्टीने स्थानिक प्रशासनाला सक्त सूचना देण्याची गरज आहे. या महाप्रलयातून ज्यांची सुटका करावी लागली, त्यांची संख्या शेकड्यात असली, तरी विस्थापितांची संख्या काही लाखांत असणार आहे. घरांची पडझड, शेतजमिनींचं नुकसान, शाळांच्या, तलाठी कार्यालय- ग्रामपंचायत इमारतींचं नुकसानही मोठं असणार आहे. एवढा सगळा भार राज्य सरकार एकट्याच्या बळावर उचलू शकेल, असं दिसत नाही. त्यासाठी केंद्र सरकारच्या सढळ मदतीची गरज जाणवणार आहे. देशात अनेक ठिकाणी हे अस्मानी संकट कोसळलं असल्याने केंद्र सरकारलाही त्याची जाणीव आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी त्या आनुषंगाने केंद्रातील महत्त्वाच्या मंत्र्यांना, अधिकाऱ्यांच्या पथकाला पाहणी करण्यास सांगून मदत जाहीर करतीलच. या मदतीचा समन्वय ठेऊन त्यातून प्रभावी काम होणं आणि कमीत कमी वेळेत ग्रामीण जीवन पूर्वपदावर आणणं हेच पुढचं आव्हान आहे. प्रथम सरकारने, स्वयंसेवी, नागरी संस्थांनीही त्यासाठी लगेच पुढाकार घ्यायला हवा.

## सखी : मासिक पाळी



पॅडमॅनसारख्या चित्रपटांमुळे समाजातील मासिक पाळीविषयीचे गैरसमज दूर होण्यास मदत होत आहे. पुरुषांसोबतच महिलांनी मासिक पाळी या विषयाकडे वैज्ञानिक दृष्टिकोनातून पाहणे अत्यंत गरजेचे आहे. तसेच या विषयाची पूर्ण माहिती असलेल्या व्यक्तीनेही मासिक पाळीविषयीची माहिती इतरांना द्यावी आणि समाजात जागृती निर्माण करावी, असे मला वाटते.- **दर्शन भोळे, जोशी बेडेकर महाविद्यालय, ठाणे**

## डॉक्टर टीप्स

पूर्वीच्या काळी एखाद्या महिलेला मासिक पाळी आल्यास त्या महिलेला स्वयंपाक करणे, सार्वजनिक ठिकाणी पाणी भरण्यास जाणे, अशी विविध कामे करण्यास मनाई असे. आजही अनेक ग्रामीण भागांत अशा प्रकारच्या अंधश्रद्धा मानल्या जातात. मात्र, मुंबईसारख्या शहराच्या ठिकाणी कमी आकाराची घरे असल्याने या अंधश्रद्धा पाळणे शक्य नाही. घरांचे आकार लहान असल्याने या रूढी पंरपरा बाद झाल्या.

## विनोद




पोलिस एका चोराला पकडतात. त्याच्याकडे बराच ऐवज सापडतो. आश्चर्य वाटून पोलिस विचारतो, 'एवढा ऐवज तू एकट्याने चोरलास?' त्यावर चोर शांतपणे म्हणतो, 'होय साहेब. हल्ली कुणावर विश्वास ठेवण्यात अर्थ नाही.

## संदेश

Mareez:-doctor ,mujhe ek serious bimari hai,main jo kuch bhi bolta hoon bhool jata hoon.
Doctor:-aapko ye bimaari kab se hai?
Mareez:-kaun si bimaari?

## सुविचार

दूरस्थ साधु-संत हिमनगांसारखे लांबूनही दिशा उजळतात; जवळचे दुर्जन मात्र रात्री फेकलेल्या बाणांसारखे न दिसूनही हानी करतात.

\- अज्ञात




**संस्कृत सुभाषित**

**अष्टादशपुराणेशु व्यासस्य वचनद्वयम्।**
**परोपकारः पुण्याय पापाय परपीडनम्।।**

अर्थ - अठरा पुराणांमध्ये व्यासांची दोन वचने सांगण्यात आलेली आहेत. ती म्हणजे इतरांना सहकार्य करणे (परोपकार करणे) म्हणजेच पुण्य आणि इतरांना पीडा देणे म्हणजेच पाप होय.

# मनोरंजक महाशब्दकोडे

कोडे क्र. १०



### आडवे शब्द

१. बगीचा
२. जवळचा मित्र
५. नेहमी नेहमी
९. फावला वेळ
१०. आश्रयदाता
११. अंगवळणी पडलेली कृती
१३. वस्तूनिर्मितीचा उद्योग
१५. पिल्लू
१६. छोटा
१८. ताडन करणे
२०. समुद्रमंथनातून निघालेले विष
२२. पायरी
२३. आश्वासन
२४. मैत्रीण
२५. मनाचा ग्रह
२६अ. तुझा
२७. युद्ध, खेळ
२८. बरोबर
३०. हरित रंग
३२. भेद
३४. ध्वनी
३५. अलंकार
३७. वह्या-पुस्तके शाळेत घेऊन जायची पिशवी
३८. स्पष्ट, रोखठोक
४२. टोक
४३. पूर्ण भाग जाणारी संख्या
४४. कुऱ्हाडीचे पाते
४६. आस्था, प्रेम
४८. रगेल
५१. दडून बसणे
५३. वर्ष
५४. बंदुकीची गोळी
५७. आनंद
५८. मिळून सर्व
५९. आवाज
६०. कष्ट, अपेष्टा
६१. वाद
६३. क्रीडांगण
६५. विष्णु
६८. तांदळातले बी
७०. रसाळ
७३. सापाची एक जात
७४. फोडणीचे ताक
७५. जनता
७७. पातकी
७८. भग्नावस्थेतील वाडा इ.
७९. सरिता
८०. नामस्मरण
८१. साखर तयार करताना निघणारा मळ
८२. अर्धा 'र' दाखवणो चिन्ह

### उभे शब्द

१. लहानसा
२. पिंपरी-चिंचवडला पाणीपुरवठा करणारी नदी
३. कुरकूर
४. बेरीज करणे
५. वारा, संगीतकार डॉ.कुलकर्णी यांचे नाव
६. नमस्कार
७. गुलाम
८. खर्च
९. मित्र
१२. वस्ती
१४. जीभ
१५. सरस्वती
१७. आंब्याची लोकप्रिय जात
१८. पत्राची सुरुवात
१९. माता
२०. उपस्थित
२१. चटकन
२२. उंच मानेचा प्राणी
२३. डावा
२४. विनासायास
२६. तीस दिवस
२७. नवस
२८. प्रश्न
२९. मोठा भाऊ
३१. विवादस्पद
३३. दाक्षिणात्य आमटी
३६. स्वत: भोवती गोल फिरणे
३९. रणमाड्यावरचे शस्त्र
४०. भय
४१. एक उग्र वासाची पालेभाजी
४२. हिंदीत शांती
४३. शासन
४५. चारित्र्य
४६. सहा पैशाचे जुने चलन
४७. भांडणातील मध्यस्थ
४९. वाद्य वाजवणारा
५०. पूल, साकव
५२. बक्षिसाचे चिन्ह
५३. सतत
५५. फुलणे, बहरणे
५६. चंदन यावर उगाळतात
५७. नाजूक, लुभावणारे
६२. लपंडाव
६४. पुरुष
६६. मृत्यू
६७. मनातील किंतु
६९. वाघाचे ओरडणे
७१. शासन
७२. सुट्टीचा दिवस
७३. चिंतन
७४. गुरांचा समूह
७६. सूर्य
७७. पातक

### आडवे उत्तर

१.बाग २.परममित्र ५.सदानकदा ९.सवड १०.वाली ११.सवय १३.कारखाना १५.शावक १६.लहान १८.मारणे २०.हला-हल २२.जिना २३.वायदा २४.सई २५.समज २६अ.तव २७.सामना २८.सह ३०.हिरवा ३२.फरक ३४.आवाज ३५.दागिना ३७.दप्तर ३८.सडेतोड ४२.अग्र ४३.सम ४४.फरशी ४६.आपुलकी ४८.मस्तवाल ५१.लपणे ५३.सन ५४.काडतूस ५७.मोद ५८.एकत्र ५९.रव ६०.हाल ६१.कलह ६३.मैदान ६५.रमण ६८.पाकड ७०.रसदार ७३.मणेर ७४.कढी ७५.रयत ७७.पापी ७८.पडका ७९.नदी ८०.जपतप ८१.मळी ८२.रफार

### उभे उत्तर

१.बारका २.पवना ३.रड ४.मिळवणे ५.सलील ६.नमन ७.दास ८.व्यय ९.सखा १२.वसाहत १४.रसना १५.शारदा १७.हापूस १८.मायना १९.आई २०.हजर २१.लवकर २२.जिराफ २३.वाम २४.सहज २६.महिना २७.साकडे २८.सवाल २९.दादा ३१.वादग्रस्त ३३.रसम ३६.गिरकी ३९.तोफ ४०.डर ४१.शेपु ४२.अमन ४३.सरकार ४५.शील ४६.आणे ४७.लवाद ४९.वादक ५०.सेतू ५२.पदक ५३.सर्वदा ५५.डवरणे ५६.सहाण ५७.मोहक ६२.लपाछपी ६४.नर ६६.मरण ६७.अढी ६९.डरकाळी ७१.सरकार ७२.रविवार ७३.मनन ७४.कळप ७६.तपन ७७.पाप



# क्रीडा विश्व



## थोडक्यात/ संक्षिप्त

### महान अंपायर डिकी बर्ड यांचे निधन



लंडन-क्रिकेटच्या सर्वोत्तम अंपायर पैकी एक म्हणून ज्यांची गणना होते, त्या डिकी बर्ड यांचं निधन झालं आहे. ९२ व्या वर्षी डिकी बर्ड यांनी अखेरचा श्वास घेतला. डिकी बर्ड यांनी दोन दशकांहून जास्त काळ आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये अंपायर म्हणून भूमिका बजावली. डिकी बर्ड ६६ टेस्ट आणि ६९ वनडे सामन्यांमध्ये अंपायर होते. यामध्ये पहिल्या तीन वनडे वर्ल्ड कप फायनलचा समावेश होता.भारताने १९८३ साली पहिला वर्ल्ड कप जिंकला, त्या सामन्यात डिकी बर्ड अंपायर होते. अमरनाथ यांच्या बॉलिंगवर डिकी बर्ड यांनी मायकल होल्डिंगला एलबीडब्ल्यू आऊट दिलं, त्याच क्षणी भारताने पहिल्यांदाच वर्ल्ड कप जिंकून इतिहास घडवला.

***

### आणखी एका भारतीय खेळाडूच्या करिअरचा शेवट!

मुंबई-टीम इंडिया युएईमध्ये सध्या आशिया कप खेळत आहे. भारतीय टीम आशिया कपच्या फायनलमध्ये पोहोचली तर रविवार २८ सप्टेंबरला त्यांना खेळावे लागेल, यानंतर ४ दिवसांमध्येच २ ऑक्टोबरपासून भारत-वेस्ट इंडिज यांच्यातल्या टेस्ट सीरिजला सुरूवात होत आहे. २ टेस्ट मॅचच्या या सीरिजसाठी बुधवारी भारतीय टीमची घोषणा होणार आहे.

***

### गावसकरांनी काढली पाकिस्तानच्या प्रीमियम बॉलरची इज्जत

दुबई-आशिया कपच्या सुपर-४ च्या सामन्यात भारताने पाकिस्तानवर ६ विकेटने विजय मिळवला. टीम इंडियाच्या या कामगिरीचं भारताचे महान क्रिकेटपटू सुनिल गावसकर यांनी कौतुक केलं. या सामन्यात तिलक वर्माने पाकिस्तानचा सर्वोत्तम बॉलर शाहीन शाह आफ्रिदीला नेट मधल्या स्पिन बॉलरसारखं मारल्याचा टोला गावसकरांनी लगावला आहे.
भारत-पाकिस्तान सामन्यात तिलक वर्माने चांगली कामगिरी केली. चौथ्या क्रमांकावर बॅटिंगला आलेल्या तिलक वर्माने सावध सुरूवात केली.

***

### लेडी लकची जादू कायम, अर्जुन तेंडुलकरने घेतली द्रविडच्या मुलाची विकेट

मुंबइ-सचिन तेंडुलकर आणि राहुल द्रविड, भारताच्या या दोन महान क्रिकेटपटूंनी देशाला अनेक ऐतिहासिक सामने जिंकून दिले. भारताच्या या दोन क्रिकेटपटूंची मुलं आता एकमेकांविरुद्ध उभी ठाकली आणि एकाने दुसऱ्याला आऊटही केलं. सचिनचा मुलगा अर्जुन आणि द्रविडचा मुलगा समित एका सामन्यात समोरासमोर आले होते.अर्जुन आणि समित हे दोघेही भारतीय क्रिकेटमध्ये स्वत:चं स्थान मिळवण्यासाठी अथक परिश्रम करत आहेत. कर्नाटकमधील अलूर येथील एका स्थानिक स्पर्धेमध्ये अर्जुन आणि समित एकमेकांविरुद्ध खेळत होते.

***

### केरळमध्ये विश्वविजेत्या अर्जेंटिनाची ऑस्ट्रेलियाशी मैत्रीपूर्ण फुटबॉल लढत?

थिरुवनंतपुरम-वलयांकित फुटबॉलपटू लिओनेल मेसीच्या नेतृत्वाखालील विश्वविजेता अर्जेंटिना संघ नोव्हेंबर महिन्यात केरळमधील आपली मैत्रीपूर्ण लढत ऑस्ट्रेलियाविरुद्ध खेळण्याची शक्यता आहे. या सामन्याची अंतिम तारीख ठरली नसली, तरी सामना १२ ते १८ नोव्हेंबरदरम्यान कोणत्याही दिवशी कोची येथे होऊ शकतो, असेही केरळ राज्याच्या क्रीडा विभागातील अधिकृत सूत्रांनी सांगितले.

# आशिया कपमध्ये भारताला बांग्लादेशचे आव्हान

अबुधाबी :आशिया कपमध्ये भारत सुपर फोरच्या दुसऱ्या सामन्यासाठी सज्ज झाला आहे. सूर्यकुमार यादवच्या नेतृत्वाखालील टीम इंडियाला बांगलादेशचे आव्हान मोडित काढावे लागणार आहे. दुबई आंतरराष्ट्रीय स्टेडियमवर होणाऱ्या सामन्यासाठी भारताच्या प्लेइंग इलेव्हनमध्ये दोन बदल होण्याची शक्यता आहे.
या स्पर्धेत रिंकू सिंगला आतापर्यंत संधी मिळालेली नाही. बांगलादेशविरुद्धच्या सामन्यात तो अक्षर पटेलची जागा घेऊ शकतो अशी चर्चा आहे. पाकिस्तानविरुद्धच्या सामन्यात कर्णधार सूर्यकुमार यादवने त्याला फक्त एक षटक टाकण्यास सांगितले होते. दरम्यान, वेगवान गोलंदाज जसप्रीत बुमराहला पुन्हा एकदा विश्रांती दिली जाऊ शकते. त्याच्या जागी अर्शदीप सिंग प्लेइंग इलेव्हनमध्ये परतू शकतो. बुमराहने पाकिस्तानविरुद्धच्या चार षटकांच्या स्पेलमध्ये सर्वाधिक ४५ धावा दिल्या होत्या. त्याची इकॉनॉमी देखील ११.२५ होती आणि त्याला एकही विकेट घेण्यात यश आले नव्हते. दरम्यान, अर्शदीपने आतापर्यंत फक्त एक सामना खेळला आहे. ज्यामध्ये त्याने एक विकेट घेतली आहे.




आकडेवारीनुसार, हा सामना एकतर्फी होण्याची अपेक्षा आहे. कारण बांगलादेशने दोन्ही संघांमधील १७ टी-२० सामन्यांपैकी फक्त एकच सामना जिंकला आहे. शेख हसीना सरकारच्या पतनानंतर भारताचे बांगलादेशशी राजनैतिक संबंध देखील ताणले गेले आहेत. लोकशाही पद्धतीने निवडून आलेले सरकार सत्तेत राहिल्यास, बीसीसीआयने या वर्षी ऑगस्टमध्ये बांगलादेशमध्ये होणारी मालिका २०२६ पर्यंत पुढे ढकलली होती. कागदावर भातीयय संघ अधिक मजबूत आहे. पण बांग्लादेशला कमी लेखण्याची चूक भारतीय संघ करणार नाही. सूर्यकुमार याद-वचा संघ आणखी एका विजयासाठी प्रबळ दावेदार आहे. पण टी-२० क्रिकेटमध्ये काहीही भाकित करता येत नाही आणि बांगलादेशचे फिरकीपटू दमदार कामगिरीने भारताला धक्का देण्यास सज्ज आहेत. पण फलंदाजीत बांगलादेशचा संघ भारतापेक्षा पिछाडीवर आहे. भारतीय सलामीवीर अभिषेक शर्मा चांगल्या फॉर्ममध्ये आहे. त्याने २१० च्या सरासरीने धावा केल्या आहेत. पाकिस्तानविरुद्धच्या सामन्यानंतर शुभमन गिलचा स्ट्राइक रेट १५८ च्या आसपास आहे.
बांगलादेशचे दोन सर्वोत्तम टी-२० फलंदाज कर्णधार लिटन दास आणि तौहिद हृदयॉय यांना फारसा प्रभाव पाडता आलेला नाही. बांगलादेशला भारताने प्रथम फलंदाजी करावी असे वाटेल आणि वेगवान गोलंदाज मुस्तफिजूर रहमान, त्यांचे फिरकी गोलंदाज रिशाद हुसेन आणि ऑफ-स्पिनर मेहदी हसन यांच्यासह लवकर विकेट घेण्यास प्रयत्नशील असेल. बांगलादेशने भारताला १५०-१६० धावांपर्यंत रोखले तरच त्यांना विजयाची आशा असणार आहे. आता भारतीय संघ आपली विजयी मालिका कायम राखतो की, बांग्लादेशचा संघ भारताला दे धक्का देतो याकडेच तमाम क्रिकेट चाहत्यांचे लक्ष असणार आहे.

# विराट कोहली ऑस्ट्रेलियाविरूद्ध वनडे मालिका खेळणार नाही?

## अजित आगरकरांनी संपर्क केला पण...काय घडले?



मुंबई-भारताचे दोन्ही दिग्गज खेळाडू विराट कोहली आणि रोहित शर्मा यांना पुन्हा क्रिकेट खेळताना पाहण्यासाठी चाहते उत्सुक आहेत. ऑक्टोबरमध्ये होणाऱ्या ऑस्ट्रेलियाविरूद्ध वनडे मालिकेत हे दोन्ही खेळाडू पुनरागमन करणार आहेत. पण यादरम्यान आता विराट कोहलीबाबत एक रिप-ोर्ट समोर आला आहे. ज्यामध्ये ऑस्ट्रेलियाविरूद्ध वनडे मालिकेत विराट खेळणार की नाही याबाबत शंका व्यक्त केली जात आहे.
विराट कोहली आणि रोहित शर्मा दोघेही अखेरचे ९ मार्चला टीम इंडियाची जर्सी घालून मैदाना-वर उतरले होते. चॅम्पियन्स ट्रॉफीमधील अंतिम सामन्यात भारताने न्यूझीलंडचा पराभव करत जे-तेपद पटकावलं होतं. यानंतर दोघेही आयपीएल २०२५ मध्ये खेळताना दिसले होते. त्यानंतर त्यांना खेळताना पाहण्याची ही पहिलीच वेळ असणार आहे. पण यादरम्यान अजित आगरकरांनी विराट कोहलीला फोन केला असता त्याच्याकडून अपेक्षित प्रतिसाद मिळाला नसल्याचं रेव्हस्पोर्ट्जने रिपोर्टमध्ये म्हटलं आहे.टीम इंडियाचे मुख्य निवडकर्ता अजित आगरकर यांनी दोघांनाही फोन करून ऑस्ट्रेलिया अ विरुद्धच्या एकदिवसीय मालिकेत भारत अ संघाकडून खेळण्यास सांगितले आहे. रोहित शर्माबरोबर याबाबत चांगली चर्चा झाली, तर विराट कोहलीने या विषयावर मौन बाळगले आहे.
ठर्शींोंिीं च्या सूत्रांनुसार, मुख्य निवडकर्ता अजित अगारकर यांनी अलीकडेच अनुभवी फलंदाज विराट कोहलीशी वनडे क्रिकेटमधीव त्यांच्या भविष्यातील योजनांविषयी चर्चा करण्यासाठी संपर्क साधला. पण कोहलीच्या बाजूने अपेक्षित असा प्रतिसाद न मिळाल्याने काहीशी नकारात्मकता जाणवली. टीम मॅनेजमेंटनुसार रोहित शर्मा आणि कोहली दोघेही ऑस्ट्रेलिया अ विरुद्ध भारत अ वनडे मालिकेत सहभागी व्हावेत.रेव्ह स्पोर्ट्सच्या रिपोर्टमध्ये म्हटलं आहे की, विराट कोहली या प्रकरणावर मौन बाळगून आहे आणि ऑस्ट्रेलिया अ विरुद्धच्या मालिकेत खेळण्यास तयार नाही.



चीनमधील लिओनिंग प्रांतातील डालियान येथे झालेल्या युनिव्हर्सिटी वर्ल्ड कप फुटबॉलमध्ये भाग घेताना विकास अभ्यास विद्यापीठ आणि पॉलिस्टा विद्यापीठाचे खेळाडू.

# पाकिस्तानचा रडीचा डाव, भारताविरुद्ध सामन्यात मॅच रेफरीनंतर आता थर्ड अंपायरची केली तक्रार

**मुंबई**-आशिया कप २०२५ मध्ये भारताने सलग दोनवेळा पाकिस्तानचा लाजिरवाणा पराभव केला आहे. पहिल्या सामन्यात नो हॅन्डशेकमुळे पाकिस्तानी क्रिकेट बोर्डाने मॅच रेफरी विरो-धात आयसीसीकडे तक्रार केली. आता पुन्हा सुपर ४ सामन्यात थर्ड अंपायरच्या निर्णयावर प्रश्न उपस्थित करून पीसीबीने आयसीसीकडे तक्रार केली आहे. दुबईमध्ये भारताविरुद्ध २०२५ च्या आशिया कप सुपर फोर सामन्यादरम्यान फखर झमानच्या वादग्रस्त विकेट प्रकरणी पाकिस्तान क्रिकेट संघ व्यवस्थापनाने आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषदेकडे ही तक्रार केली आहे.आशिया कप सुपर ४ मध्ये पाकिस्तान संघाने भारताविरुद्ध फखर जमांला ओपनिंग स्लॉटमध्ये फलंदाजी करायला पाठवलं होतं. फखर जमांने सुरुवात अतिशय चांगली केली आणि १५ धावा केल्या, फील्ड अंपायरने कॅचवर निर्णय घेतला आणि तो तिसऱ्या अंपायरकडे पाठवला. टीव्ही अंपायरने रिव्ह्यू तपासून भारताच्या बाजूने निर्णय देत फखर जमांला बाद घोषित केले. मात्र बॉल संजू सॅमसनच्या हातात येण्यापूर्वी बाउंस झाला होता, थर्ड अंपायरने दिलेला निर्णय चुकीचा आहे असे पाकिस्तानी खेळाडू आणि फॅन्सकडून सांगण्यात आले.
नेमकं काय घडलं?
तिसऱ्या ओव्हरच्या तिसऱ्या बॉलवर पाकिस्तानचा फलंदाज फखर जमा स्ट्राईकवर होता. तर हार्दिक पंड्या हा गोलंदाजी करण्यासाठी आला. तेव्हा फखर जमाच्या बॅटला कट लागून सामना बॉल मागे गेला. तेव्हा विकेटकिपर संजू सॅमसनने तो कॅच पकडला. मैदानातील अंपायरने बाद निर्णय दिला, मात्र त्यानंतरही पाकिस्तानने त्याच्यावर रिव्ह्यू घेतला. थर्ड अंपायर रुचिर पल्लियागुरुगेने निर्णय देण्यापूर्वी अगदी व्यवस्थित तपास-ले की बॉल अगदी स्पष्ट संजूच्या हातात गेला आहे की नाही. खूप वेळ तपासल्यावर त्यांनी फखर जमानला बाद निर्णय दिला. परंतु तरीही पाकिस्तानचे फॅन्स थर्ड अंपायरच्या या निर्णयावर नाराज दिसले. त्यानंतर त्यांनी भारतीय संघावर राग व्यक्त करायला सुरुवात केली.



कतारचे दोहा येथे अरब गल्फ फुटबॉल फेडरेशन अंडर-१७ गल्फ कपच्या ग्रुप बी फुटबॉल सामन्यात भाग घेताना कतार आणि येमेनचे खेळाडू.

# सचिन आला आणि शिवाजी पार्कमधलं वातावरण एकदम बदललं

मुंबई : दादरच्या शिवाजी पार्क मैदानावर असलेल्या शिवाजी पार्क जिमखान्याच्या नव्या इमारतीचे उद्घाटन भारतरत्न सचिन तेंडुलकरच्या हस्ते झालं. शिवाजी पार्क जिमखाना पुन्हा एकदा क्रीडापटूंसाठी सुरू झाला. मागील दीड वर्षापासून शिवाजी पार्क जिमखान्याचे नूतनीकरण सुरू होते. घटस्थापनेच्या दिवशी सकाळीच सचिनच्या हस्ते जिमखान्याच्या नव्या इमारतीचे उद्घाटन झाले. याप्रसंगी मनसे प्रमुख राज ठाकरे, मंत्री आशिष शेलार जिमखान्याचे अध्यक्ष आणि पदाधिकारी उपस्थित होते.
'मुलींसाठी ही व्यवस्था सर्व जिमखान्यांवर हवीच'
शिवाजी पार्क जिमखाना नूतनीकरणाच्या



कामात राज ठाकरे यांचे उल्लेखनीय यो-गदान आहे. जिमखान्याचे अध्यक्ष आणि पदाधिकारी यांनीही विचारपूर्वक काम केले. खेळाडूंसाठी उत्तम सोयीसुविधा निर्माण करण्यात आल्या. जिमखान्यात मुलांप्रमाणेच मुलींसाठीही कपडे बदलण्यासाठी चांगली व्यवस्था आहे. ही व्यवस्था कौतुकास्पद आहे. आता क्रीडा क्षेत्रात मुलांप्रमाणेच मुलीही मोठ्या संख्येने सहभागी होत आहेत. यामुळे देशातील सर्व जिमखान्यांमध्ये मुलांप्रमाणेच मुलींसाठीही कपडे बदलण्यासाठी चांगली व्यवस्था असणे आवश्यक आहे, असे सचिन म्हणाला. त्याने जिमखान्याच्या नव्या इमारतीच्या कामाचे तसेच यात प्रत्यक्ष अप्रत्यक्षरित्या सहभागी झालेल्या सर्वांचेच अभिनंदन केले.

# पाकिस्तानचा सुपर फोरमध्ये मोठा विजय, श्रीलंका आशिया चषक स्पर्धेतून बाहेर?

पाकिस्तानने आशिया चषक सुपर फोर सामन्यात श्रीलंकेवर विजय मिळवत अंतिम फेरीतील आशा जिवंत ठेवल्या आहेत.
आशिया चषक सुपर फोरमधील दुसऱ्या सामन्यात पाकिस्तानने श्रीलंका संघावर शानदार विजय मिळवला आहे. या विजयासह पाकिस्तानने अंतिम सामना खेळण्याचा आशा कायम ठेवल्या आहेत. पाकिस्तानच्या मधल्या फळीने आणि गोलंदाजांनी चांगली कामगिरी करत या विजयात मोठं योगदान दिलं आहे. सुपर फोरमधील भारत आणि बांगलादेश यांच्यातील सामन्यात जर भारताने बांगलादेशवर विजय मिळवला तर श्रीलंकेचं स्पर्धेतील आव्हान संपुष्टात होईल.
पाकिस्तानने नाणेफेक जिंकत प्रथम गोलंदाजीचा निर्णय घेतला, हा निर्णय संघाच्या पथ्यावर पडला. पाकिस्तानच्या वेगवान गोलंदाजांनी उत्कृष्ट कामगिरी करत श्रीलंकेच्या फलंदाजांना मोठी धावसंख्या उभारू दिली नाही. श्रीलंकाकडून कामिंदू मेंडिसने अर्धशतक झळकावलं. याशिवाय इतर सर्व फलंदाज १५ धावांची खेळीदेखील करू शकले नाहीत. तर कुसल मेंडिस आणि दासुन शनाका हे फलंदाज शून्यावर बाद झाले.पाकिस्तानकडून शाहीन शाह आफ्रिदीने ३ विकेट्स, हारिस रौफ व हुसैन तलत यांनी प्रत्येकी २ विकेट्स घेतल्या. तर अबरार अहमदने १ विकेट घेतली. यासह श्रीलंकेच्या संघाने प्रथम फलंदाजी करताना ८ विकेट्स गमावत १३३ धावा केल्या.
श्रीलंकेने दिलेल्या १३३ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना पाकिस्तानने पॉवरप्लेमध्ये चांगली सुरूवात केली आणि संघाने एकही विकेट न गमावता ४५ धावा केल्या. पण त्यानंतर पुन्हा एकदा पाकिस्तानने झटपट विकेट गमावल्या. पण मोहम्मद नवाज आणि हुसैन तलतने अर्धशतकी भागीदारी करत पाकिस्तानचा डाव सांभाळला आणि संघाला विजय मिळवून देण्यात मोठी भूमिका बजावली.
साहिबजादा फरहानने मैदानात येताच आक्रमक फलंदाजी सुरू केली आणि फखर जमानसह ४५ धावांची जलद भागीदारी करत संघाला चांगल्या स्थितीत आणलं. पण, सहाव्या आणि नवव्या षटकांदरम्यान पाकिस्तानने केवळ १७ चेंडूत चार विकेट गमावल्या. वानिंदू हसरंगा आणि महिश तीक्ष्णाच्या फिरकी जोडीने प्रत्येकी दोन विकेट घेतल्या आणि पाकिस्तानच्या धावांना ब्रेक लावला. त्यानंतर, ८० धावांवर, पाचवी विकेट पडली आणि श्रीलंकाने पुनरागमन केलं. पण त्यानंतर हुसेन तलत (नाबाद ३२) आणि मोहम्मद नवाज (नाबाद ३८) यांनी ५८ चेंडूत नाबाद ५८ धावांची भागीदारी करून संघाला फक्त १८ षटकांत ५ गडी राखून विजय मिळवून दिला.



# घटस्थापनेच्या मुहूर्तावर एमआयटी डब्ल्यूपीयूत "पंढरीचा राजा पंढरीनाथ, विश्व माऊली विश्वनाथ" कार्यक्रमाचे सादरीकरण

## विद्यार्थ्यांनी सादर केली भक्ती गीते व ९ रसांवर आधारित नृत्य

**पुणे/प्रतिनिधी :** संगीतातून निर्माण होणारा भक्तिरस, आत्म्याला भिडणारा अनुभव, लय व माधुर्य आणि आध्यात्मिक अनुभव या सर्वांची अनुभूती तसेच नृत्याच्या माध्यमातून भारतीय अध्यात्मातील ९ रसांची अनुभूती घटस्थापनेच्या मुहूर्तावर माईर्स एमआयटीच्या प्रांगणात जाणवली.

निमित्त होते माईर्स एमआयटी वर्ल्ड पीस युनिव्हर्सिटीच्या विद्यार्थ्यांनी स्थापन केलेल्या 'फनकार फोरमच्या माध्यमातून सादर करण्यात अलेल्या "पंढरीचा राजा पंढरीनाथ, विश्व माऊली विश्वनाथ" या अध्यात्मिक गीत आणि नृत्याच्या कार्यक्रमाचे. भारतीय संस्कृती, परंपरा व अध्यात्माची महती युवक व विद्यार्थ्यांपर्यंत पोहचविण्याचा मुख्य उद्देश्य ठेऊन याचे आयोजन करण्यात आले होते.

यावेळी माईर्स एमआयटीचे संस्थापक अध्यक्ष विश्वधर्मी प्रा.डॉ. विश्वनाथ दा. कराड, नागपूर विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. एस.एन.पठाण, डब्ल्यूपीयूचे कुलसचिव





प्रा.गणेश पोकळे, सीएओ डॉ. प्रसाद खांडेकर, पीस स्टडीजचे डॉ. मिलिंद पात्रे, डॉ. अंजली साने, डॉ.रोहिणी काळे व डॉ. महेश थोरवे यांची प्रमुख उपस्थिती होती.

विठोबा व ज्ञानेश्वर माऊली या थीम वर आधारित 'कानडा राजा पंढरीचा','जरा ज्ञानदेवा मुक्ताईचे ऐका', सारखे अनेक भक्ती गितांचे सादरीकरणाने उपस्थितांना साक्षात माऊलीचे दर्शन घडल्यासारखे झाले. सुयश चांडोलकर व सर्वेश रोटकर त्यांच्या चमुने ही भक्ती गिते सादर केली. नवरात्र महोत्सवाच्या निमित्ताने नवरस जसे श्रृंगार, हास्य, करुणा, रौद्र, वीर, भयानक, बीभत्स, अभ्दुत आणि शांत रसांवर आधारित नृत्य भरतनाट्यम् व कथ्थकच्या माध्यमातून सादर करण्यात आले. त्याच प्रमाणे माँ कालीच्या नृत्य सादरीकरणाने सर्वांना मंत्रमुग्ध केले. कोरिओग्राफर वेल्लरी व श्रेया या विद्यार्थी चमूने या संपूर्ण नृत्यांचे नियोजन केले.

या प्रसंगी विश्वधर्मी प्रा. डॉ. विश्वनाथ दा.कराड यांनी 'फनकार फोरम'च्या सर्व सदस्यांचा सत्कार केला. तसेच, फोरमच्या पदाधिकाऱ्यांनी प्रा.डॉ. विश्वनाथ दा कराड यांचा विशेष सत्कार केला.

डॉ. विश्वनाथ दा. कराड म्हणाले,"या सृष्टीवर एकच व्यक्ती विश्व माऊली होऊ शकते, ती म्हणजे संत ज्ञानेश्वर माऊली. यांच्या तत्वज्ञानावर आज प्रत्येक व्यक्ती जीवन व्यतीत करीत आहे. विश्वशांतीसाठी विज्ञान आणि अध्यात्माच्या समन्वयातून दिले जाणारे ज्ञान हेच सर्वश्रेष्ठ आहे. येथील विद्यार्थ्यांना दिले जाणारे ज्ञान हे विश्वगुरूच्या दिशेने वाटचाल करणार आहे. विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या या कार्यक्रमातून हे सिद्ध होते की देश विश्वशांतीच्या दिशेने वाटचाल करीत आहे."

डॉ. मिलिंद पात्रे म्हणाले,"जगप्रसिद्ध संगणक शास्त्रज्ञ डॉ. विजय भटकर सांगतात की ज्या दिवशी या देशात शिक्षित विद्यार्थी हा भजन, कीर्तन, व वारीत माऊलीच्या तालावर नाचतील तेव्हाच भारत खऱ्या अर्थाने विश्वगुरू म्हणून उद्यास येईल. "

'फनकार फोरम'चे संस्थापक सदस्य सुदीप दहीफळे, प्रज्वल गुप्ता, आदिती, जिज्ञासा व प्रतिक्षा यांनी कार्यक्रमाचे नियोजन व आयोजन केले.

डॉ. सचीन गाडेकर यांनी सूत्रसंचालन केले.

## महाराष्ट्र राज्य औषध परिषद तर्फे आयोजित रील्स स्पर्धेमध्ये चन्नबसवेश्वर फार्मसी महाविद्यालयाचे विद्यार्थी प्रथम

**लातूर/प्रतिनिधी :** येथील पंचाक्षरी शिवाचार्य ट्रस्ट द्वारा संचालित चन्नबसवेश्वर फार्मसी पॉलिटेक्निकचे कु. आशीतोष रत्नपारखे व कु. आफताब कादरी हे महाराष्ट्र राज्य औषध परिषद तर्फे आयोजित केलेल्या राज्यस्तरीय रील्स स्पर्धेत विद्यार्थी गटामधून प्रथम तर याच महाविद्यालयाचे माझी विद्यार्थी श्री. अमोल गबाले हे या गटातून प्रथम स्थानी राहिलेले आहे. २५ सप्टेंबर हा दिवस जागतिक फार्मासिस्ट दिन म्हणून जगभरात साजरा करण्यात येतो. त्याचे औचित्य साधून महाराष्ट्र राज्य औषध परिषद, मुंबई यांनी व अशा विविध विषयावर रील्स बनवण्याची स्पर्धा आयोजित केली होती. यासाठी फार्मासिस्टचे विद्यार्थी, फार्मसी कॉलेजचे शिक्षक, औषधी कारखान्याचे व्यक्ति आणि औषधी दुकानदार असे विविध गट पाडण्यात आले होते. या स्पर्धेसाठी राज्यातून वरील गटातून नामनिर्देश मंगविण्यात आले होते आणि या स्पर्धेचे सादरीकरण १९ सप्टेंबर २०२५ रोजी परिषदेच्या मुंबई येथे कार्यालयात तज्ञ व्यक्ति समोर करण्यात आले. यातून मराठवाडा विभागातून विद्यार्थी गटातून आणि औषधी दुकानदार या गटातून असे दोन प्रथम परितोषक चन्नबसवेश्वर फार्मसी पॉलिटेक्निक महाविद्यालायला मिळाल्याचे परिषदेकडून घोषित करण्यात आले.

विजेत्याना परिषदेकडून परितोषक जागतिक फार्मासिस्ट दिनाच्या औचित्य साधून एका विशेष समारंभात देण्यात येणार असल्याचे परिषदेने कळविले आहे. या पारितोषकाने चन्नबसवेश्वर फार्मसी पॉलिटेक्निक महाविद्यालयलयाच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला आहे. या यशबद्दल विजयी विद्यार्थ्यांचे व माझी विद्यार्थ्यांचे या संस्थेचे सचिव श्री. भीमाशंकर देवणीकर, संस्थेचे विस्वस्थ श्री. विजयकुमार मठपती, श्री. सिद्धेश्वरअप्पा हलकुडे, डॉ. अशोक सांगवीकर, यांनी प्राचार्य डॉ. संजय थोंटे व प्रा. रवी राजूरकर, प्रा.भोसले पी . एच ,प्रा.सुगावे बी .के प्रा. सुगावे आर . व्ही, प्रा.कौडेवार डी. आर, प्रा.कर्डिले गंगासागर, शिक्षकेत्तर कर्मचारी श्री. शिवहार विभूते, श्री. अमोल सोनकांबळे, श्री. उमाकांत गचाटे, श्री. प्रदीप रामेगावकर, श्री. ईश्वर डोंगरे, श्री. गणेश स्वामी यांनी या यशाबद्दल अभिनंदन केले.

## दयानंद विज्ञानच्या औद्योगिक रसायनशास्त्र व रसायनशास्त्र विभागाच्या पोस्टर प्रेझेंटेशन स्पर्धेला उत्स्फूर्त प्रतिसाद



**लातूर/प्रतिनिधी :** येथील दयानंद शिक्षण संस्था संचलित,दयानंद विज्ञान महाविद्यालयातील औद्योगिक रसायनशास्त्र विभाग व रसायनशास्त्र विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने दि.१९ सप्टेंबर २०२५ रोजी पोस्टर प्रेझेंटेशन स्पर्धेचे आयोजन करण्यात आलेले होते.या स्पर्धेचे उद्घाटन महाविद्यालयाचे प्र.प्राचार्य डॉ.सिद्धेश्वर बेल्लाळे यांच्या हस्ते करण्यात आले.याप्रसंगी रसायनशास्त्र विभाग प्रमुख डॉ.युवराज सारणीकर,औद्योगिक रसायनशास्त्र विभाग प्रमुख डॉ.आण्णाराव चौगुले तसेच आयक्यूएसी समन्वयक डॉ.जमन अंगुलवार यांची प्रमुख उपस्थिती होती.उद्घाटनानंतर विद्यार्थ्यांच्या पोस्टर प्रेझेंटेशनचे निरीक्षण करताना प्र.प्राचार्य डॉ.सिद्धेश्वर बेल्लाळे यांनी विद्यार्थ्यांचे सादरीकरण व पोस्टर तयार करण्यासाठी घेतलेली मेहनत याचे कौतुक केले.या पोस्टर प्रेझेंटेशन स्पर्धेसाठी एकूण ३० पेक्षाही जास्त बी.एस्सी.प्रथम,द्वितीय तृतीय व पदव्युत्तर रसायनशास्त्र विभागाच्या विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्तपणे सहभाग नोंदविला.या स्पर्धेसाठी परीक्षक म्हणून इलेक्ट्रॉनिक्स विभाग प्रमुख डॉ.टी.एच.मुजावर व डॉ.महादेव पंडगे यांनी काम पाहिले.

सदरील स्पर्धेत बी.एस्सी.द्वितीय औद्योगिक रसायनशास्त्रमधून वाघमारे आरती,करपुडे प्रांजली व गारोळे वैष्णवी यांच्या ग्रुपने सर्वप्रथम क्रमांक पटकाविला तर बी.एस्सी. तृतीय वर्षाचा जाधव बळवंत याने द्वितीय क्रमांक मिळविला व बी.एस्सी.तृतीय वर्षातील पाटील प्रांजली हिने तृतीय क्रमांक पटकाविला.बी.एस्सी. रसायनशास्त्र विभागातर्फे टोंगळे शिवानी हीने प्रथम क्रमांक व वाघमारे राजलक्ष्मी हिने द्वितीय आणि हुडगे साक्षी हिने तृतीय क्रमांक मिळविला.तसेच पदव्युत्तर रसायनशास्त्रमधून कुलकर्णी अनुष्का हिने प्रथम क्रमांक व कुलकर्णी तृप्ती हिने द्वितीय क्रमांक मिळविला.

या पोस्टर प्रेझेंटेशन स्पर्धेप्रसंगी डॉ.रवी सोळुंके,डॉ. चंद्रशेखर स्वामी,प्रा.बळवंत सूर्यवंशी,डॉ.विजेंद्र चौधरी,प्रा. राहुल जाधव,डॉ.रवींद्र शिंदे,डॉ.नाथराव केदार,डॉ.श्याम इबाते,डॉ.नंदिनी कोरडे,डॉ.श्रेयश माहुरकर,डॉ.एन.एस. चिवडशेट्टी (कोरे),प्रा.सोनकांबळे विठ्ठल,प्रा.मनीषा मुंडे यांच्यासह इतर प्राध्यापक शिक्षकेत्तर कर्मचारी आणि विद्यार्थी बहुसंख्येने उपस्थित होते.

## दलित, ओबीसी, माइनॉरीटीज व आदिवासी संघटनांचा परिसंघ (डोमा) संघटनेच्या लातूर जिल्हाध्यक्षपदी डॉ. शिवशंकर कसबे यांची निवड

**लातूर/प्रतिनिधी :** दलित, ओबीसी, माइनॉरीटीज व आदिवासी संघटनांचा परिसंघ(डोमा) ही देशपातळीवर काम करणारी व्यापक संघटना आहे. राष्ट्रीय अध्यक्ष डॉ. उदित राज (माजी खासदार) यांच्या नेतृत्वाखाली संपूर्ण देशभर समाजावरील होणाऱ्या अन्याय, अत्याचाराला लगाम लावण्यासाठी , वाचा फोडण्यासाठी दलित, आोबीसी माइनॉरीटीज व आदिवासी हे चारही समाज एकत्र येऊन अन्यायाविरोधात लढा उभारण्याचे व अन्याय दूर करण्याच्या उद्देशाने वरील संघटन बांधण्यात येत आहे त्यासाठी म्हणून महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष प्रीतम आठवले यांच्या नेतृत्वात प्रत्येक जिल्ह्याच्या ठिकाणी जिल्हा संघटन उभा करून सामाजिक प्रश्न सोडविण्याचे ठरले व सदर बैठकीत खालील प्रमाणे कार्यकारिणी गठीत करण्यात आली यामध्ये लातूर जिल्हाध्यक्ष म्हणून डॉ. शिवशंकर कसबे, उपाध्यक्ष- आसिफ शेख, सचिव- डॉ. संग्राम टेकले, सहसचिव - सुदाम समुखराव, कोषाध्यक्ष- प्राचार्य बालाजी साळुंके, सह-कोषाध्यक्ष - नागनाथ डोंगरे, प्रसिध्दी प्रमुख- प्रा. श्रीकांत मुद्दे, संघटक - अमर कसबे, राजेंद्र गायकवाड,सल्लागार - प्रा.रामकिशन समुखराव तसेच सदस्य म्हणून प्रा. अनिल दराडे, प्रा. दयानंद काळे, मच्छिंद्र आम्ले, गोरोबा मगर, जालिंदर मगर, विकास सगट, अमोल उदगीरकर, प्रा.बळीराम मोठेराव, संतोष पटनुरे, संतोष मस्के,दशरथ मस्के, मनोज आत्राम यांची निवड करण्यात आली.



लातूर जिल्हाध्यक्षपदी डॉ.शिवशंकर कसबे यांची निवड झाल्याबद्दल फकिरा या निवासस्थानी प्राचार्य डॉ.माधव गादेकर व कलापंढरीचे अध्यक्ष बी.पी.सुर्यवंशी यांच्या हस्ते त्यांचा सत्कार करण्यात आला.तसेच कार्यकारिणीतील पदाधिकारी व सदस्यांना नियुक्तीपत्र देऊन त्यांचाही सत्कार करण्यात आला.

या निवडीबद्दल राष्ट्रीय अध्यक्ष डॉ. उदित राज, प्रदेश अध्यक्ष प्रीतम आठवले, किशन पारवे,मार्गदर्शक प्राचार्य डॉ.माधव गादेकर, डॉ. शिवाजी जवळगेकर, दयानंद कांबळे, के.के.मुखेडकर, उत्तम मिसाळ,मुख्याध्यापक उत्तम दोरवे,डॉ. फारुख तांबोळी, डॉ.आरेफ शेख, संतोष गादेकर, संतोष गोजरटे, डॉ. रामशेट्टी शेटकार, अशोक तोगरे, डॉ.राजेंद्र सुर्यवंशी,दिनकर मस्के, बालाजी साबळे इ. नी अभिनंदन केले.

## मध्य रेल्वेच्या सोलापूर विभागात स्वच्छता ही सेवा २०२५ मोहिमेअंतर्गत आर्ट फ्रॉम वेस्ट या विषयावर प्रदर्शन आयोजित

**सोलापूर/प्रतिनिधी :** मध्य रेल्वेच्या सोलापूर विभागाने २२ सप्टेंबर २०२५ रोजी सोलापूर येथील नवीन कोचिंग कॉम्प्लेक्स येथे आर्ट फ्रॉम वेस्ट या थीमवर एक अनोखे प्रदर्शन आयोजित केले होते. स्वच्छता ही सेवा - २०२५ मोहिमेचा भाग म्हणून या कार्यक्रमाचा उद्देश पर्यावरणीय शाश्वतता आणि कचरा व्यवस्थापनाचा संदेश पसरवून, निषिद्ध साहित्यांचा वापर कमी करणे, पुनर्वापर करणे आणि सर्जनशील वापराचे महत्त्व अधोरेखित करणे हा होता. प्रदर्शनाचे उद्घाटन अतिरिक्त विभागीय रेल्वे व्यवस्थापक (एडीआरएम) श्री अंशुमाली कुमार आणि वरिष्ठ विभागीय यांत्रिक अभियंता (सीनियर डीएमई) यांनी केले. या प्रसंगी, एडीआरएम द्वारे गुलाबाच्या रोपाचे रोपण देखील करण्यात आले, जे




कचऱ्याचे अर्थपूर्ण आणि जीवनदायी बनवण्याच्या थीमचे प्रतीक आहे.

टाकाऊ वस्तूंपासून तयार केलेल्या विविध नाविन्यपूर्ण वस्तू प्रदर्शित करण्यात आल्या. टाकाऊ प्लास्टिकच्या पाण्याच्या बाटल्या आणि रासायनिक कॅन कलात्मकपणे स्टेशनरी होल्डर, पक्षी खाद्य, फुलांच्या टोपल्या, बहुउपयोगी कंटेनर, टूलबॉक्स, वनस्पती फुलदाण्या आणि तेलाच्या फनेलमध्ये पुन्हा वापरण्यात आले. ही सर्जनशील कामे सी अँड डब्ल्यू (कॅरेज आणि वॅगन) डेपोमधील सहाय्यक श्री भीमशा मस्के यांनी तयार केली. टाकाऊ धातूच्या वस्तूंपासून, आकर्षक कलाकृती आणि हेलिकॉप्टर-आकाराचे पेपरवेट, सोफा, हत्ती, मोर, डस्टबिन, हेल्मेट स्टँड, टूलबॉक्स, रोबोटच्या आकृत्या, झाडाची भांडी धरणारे पुरुष आणि बरेच काही यासारख्या कार्यात्मक वस्तू तयार केल्या गेल्या, ज्यामुळे रेल्वे कर्मचाऱ्यांची सर्जनशील भावना दिसून आली.

सी अँड डब्ल्यू डेपो, SP-RMV (स्वयं-चालित अपघात निवारण वैद्यकीय व्हॅन) आणि ट्रॅक मशीन डेपोमधील संघांनी सक्रियपणे भाग घेतला आणि त्यांची कामे प्रदर्शनादरम्यान प्रदर्शित केली. प्रदर्शन यशस्वीरित्या आयोजित केल्याबद्दल डेपो प्रभारी श्री एस.ए. बसर्गी, एसएसई/ट्रॅक मशीन श्री टिग्गा, एसएसई/ईएनएचएम श्री जितेंद्र वाघमारे आणि त्यांच्या समर्पित संघांचे विशेष कौतुक करण्यात आले. या प्रदर्शनात सी अँड डब्ल्यू, इलेक्ट्रिकल आणि आरपीएफ कर्मचारी, कंत्राटी कर्मचारी आणि इतर अभ्यागतांचा सहभाग होता, या सर्वांनी प्रदर्शित केलेल्या सर्जनशीलता आणि नाविन्याचे कौतुक केले. एडीआरएम आणि सीनियर डीएमई यांनी या उपक्रमाचे कौतुक केले आणि स्वच्छता ही सेवा या भावनेशी सुसंगत राहण्यासाठी ईएनएचएम (पर्यावरण आणि गृहनिर्माण व्यवस्थापन) टीम आणि कर्मचाऱ्यांच्या प्रयत्नांचे कौतुक केले. या प्रेरणादायी प्रदर्शनाद्वारे, सोलापूर विभागाने पुन्हा एकदा शाश्वतता आणि नाविन्यपूर्णतेबद्दलची आपली वचनबद्धता पुन्हा एकदा सिद्ध केली की कल्पनाशक्ती आणि समर्पणाने कचरा देखील चमत्कारांमध्ये बदलता येतो.

## संत नरहरी महामंडळाच्या योजना जास्तीत जास्त सुवर्णकारापर्यंत पोचवा : संजय मैंदर्गीकर

**सोलापूर/प्रतिनिधी :** संत नरहरी आर्थिक विकास महामंडळामार्फत राबविण्यात येणाऱ्या प्रत्येक योजनांचा लाभ मिळण्यासाठी सोनार समाजातील प्रत्येक योग्य व पात्र लोकांपर्यंत पोचला पाहिजे याकरिता सोनार समाजाच्या विविध संघटना, संस्था, नेते मंडळी, सामाजिक कार्यकर्ते यांनी प्रयत्न केले पाहिजे. तरच या योजनांची अंमलबजावणी होऊन अधिकाधिक सोनार बांधवाना त्याचा फायदा होईल. यावर भर देण्याचे आवाहन सोनार समाज संस्था, सोलापूर चे अग्रणी प्रवर्तक श्री. संजयजी मैंदर्गीकर यांनी केले आहे.



महामंडळाची २० % बीज भांडवल योजना, एक लाख रु. पर्यंतची थेट कर्ज योजना, वैयक्तिक कर्ज व्याज परतावा रु. १५ लाख पर्यंतची कर्ज योजना, गट कर्ज परतावा योजना, शैक्षणिक कर्ज व्याज परतावा योजना, कौशल्य विकास प्रशिक्षण योजना, महिला स्वयं सिद्धी व्याज परतावा योजना, या शिवाय या महामंडळाच्या योजना अंतर्गत येणारे इतर सर्व व्यवसाय. या योजनांची अंमलबजावणी पारदर्शक व परिणाम कारक पद्धतीने होऊन जास्तीतजास्त लाभार्थींना त्याचा फायदा व्हावा.

या योजनांची माहिती गरजू पर्यंत योग्य प्रकारे पोहचविणे ही महत्वाची जबाबदारी आपणा सर्वांची असून या योजनांचा प्रचार व प्रसार प्रभाविपणे करण्याची जबाबदारी समाजातील विविध संघटना, संस्था, सामाजिक कार्यकर्ते, नेते मंडळींची आहे. महामंडळाच्या योजनांच्या लाभाच्या प्रक्रियेत कोणतीही अडचण येऊ नये तसेच योग्य लाभार्थींची निवड करून त्यांना वेळेवर आर्थिक मदत मिळावी. यासाठी यंत्रणानी विशेष लक्ष द्यावे अशी विनंतीही त्यांनी केली आहे.

प्रो. जडे यांचे रबरी शिक्के
कॉम्प्युटर नॉयलॉन रबर असलेले
टिकाऊ रबरी शिक्के
तयार करून मिळतील.



शाखा १.
जडे-भारत प्रिंटींग प्रेस, मेनरोड, लातूर
शाखा २.
जडे ऑफसेट प्रिंटर्स, मित्र नगर, लातूर
संपर्क: (०२३८२) २४२६०८,२४५४०९

# लातुरात अग्रसेन जयंती विविध उपक्रमांनी उत्साहात साजरी

**लातूर/प्रतिनिधी :** प्रतिवर्षाप्रमाणे यावर्षीही लातुरात समस्त अग्र कुटुंबाच्या वतीने महाराजा अग्रसेन जयंती विविध सामाजिक, सांस्कृतिक उपक्रमांनी उत्साहपूर्ण वातावरणात साजरी करण्यात आली.

लातूर शहरातील महाराजा अग्रसेन भवन याठिकाणी सोमवारी सकाळी दिनेशचंद्र ब्रिजवासी यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. याप्रसंगी अग्रवाल समाज ट्रस्ट चे अध्यक्ष नंदकिशोर अग्रवाल, कमलकिशोर अग्रवाल, अशोक अग्रवाल, विशाल अग्रवाल, आनंद अग्रवाल यांच्यासह अग्रवाल समाजातील सर्व मान्यवरांची उपस्थिती होती. ध्वजारोहणानंतर आयोजित करण्यात आलेल्या रक्तदान शिबिरात ३१ जणांनी ऐच्छिक रक्तदान केले. अग्रसेन जयंतीच्या पार्श्वभूमीवर विविध स्पर्धाही घेण्यात आल्या. त्यामध्ये दांडिया, क्रिकेट, स्लो सायकल - स्कुटर, नृत्य स्पर्धा , फॅन्सी ड्रेस स्पर्धांचा समावेश होता. तर सायंकाळी मान्यवरांच्या उपस्थितीत सांस्कृतिक कार्यक्रम पार पडला. सायंकाळी सीए संजय अग्रवाल, पुनित मित्तल, नंदकिशोर अग्रवाल यांच्या हस्ते आरती करण्यात आली.

यावेळी आयोजित समारोहात आपले मनोगत व्यक्त करताना सीए संजय अग्रवाल यांनी कोणत्याही परिस्थितीत समाज संघटित होणे अतिशय गरजेचे असल्याचे सांगितले. तुमच्याकडे कितीही मुबलक पैसे असू द्या, जर तुमचा समाजच संघटित नसेल तर त्या पैशाचा काहीही उपयोग नाही. समाजाच्या अडीअडचणी समजण्यासाठी समाजात एकरूप होणे, समाजाच्या प्रत्येक उपक्रमात हिरीरीने सहभागी होणे आवश्यक असते. ज्या समाज बांधवाला अडचण, समस्या आहे, त्याची अडचण - समस्या सोडविण्याची जबाबदारी समाजाचा एक महत्वपूर्ण घटक म्हणून आपणा सर्वांची असल्याचे त्यांनी सांगितले. आज सगळे जग धावपळीचे झाले आहे. घरातील प्रत्येक व्यक्ती - सदस्यही आपल्या कामात व्यस्त असतात. अशावेळी तुम्ही कितीही व्यस्त असलात तरी घरात सगळे एकत्रित येऊन चर्चा करा.

आपल्या मुलांवर चांगले संस्कार करा. सुसंस्कारीत पिढीच समाजाला उद्या दिशा देऊ शकणार आहे. मुलांच्या अभ्यासातील कमी - अधिक गुणांकडे फारसे गांभीर्याने न पाहता संस्काराला अधिक महत्व द्या असे आवाहनही संजय अग्रवाल यांनी केले. अशोक अग्रवाल यांनी यावेळी प्रास्ताविक केले. प्रास्ताविकात त्यांनी अग्रवाल समाज सर्वच क्षेत्रात अग्रेसर असल्याचे नमूद केले.

देशात विविध उपक्रमांनी आज अग्रसेन जयंती साजरी केली जात आहे. लातूरातही जोरदार पाऊस चालू असतानाही समाज बांधव मोठ्या संख्येने या उपक्रमात सहभागी झाले आहेत, ही बाब समाज संघटित होत असल्याचे लक्षण असल्याचेही त्यांनी सांगितले. नंदकिशोर अग्रवाल यांनीही आपल्या मनोगतात समाज संघटनावर भर दिला.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन राहुल अग्रवाल आणि अनुराधा अग्रवाल यांनी केले. तर आभार प्रदर्शन कमलकिशोर अग्रवाल यांनी केले. कार्यक्रमास विनोद अग्रवाल. सुरेंद्र अग्रवाल, आनंद अग्रवाल, नितीन अग्रवाल, विपीन अग्रवाल, महेश अग्रवाल, रवी अग्रवाल, प्रवीण अग्रवाल, रोहित अग्रवाल, उमेश अग्रवाल, श्यामसुंदर अग्रवाल, हेमा अग्रवाल, ममता अग्रवाल, नितु ब्रिजवासी, रितू ब्रिजवासी, नीता अग्रवाल, सुमन पोद्दार, मोना बन्सल, रचना ब्रिजवासी, वंदना ब्रिजवासी, ओम पोद्दार, निलेश पोद्दार यांसह समाज बांधवांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.



कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी अग्रवाल समाज ट्रस्ट, अग्रवाल समाज, अग्रवाल महिला मंडल आणि अग्रवाल नवयुवक मंडळाच्या सर्व पदाधिकाऱ्यांनी परिश्रम घेतले.

## पुणे, मुंबईकडे जाणाऱ्या बस लातूर मध्यवर्ती बसस्थानकातून सुटणार



**लातूर/प्रतिनिधी** :राज्य परिव मध्यवर्ती बसस्थानक क्र. १ लातूर येथील काँक्रीटीकरणाचे काम २७ जानेवारी, २०२५ पासून सुरु करण्यात आले होते. त्यामुळे काँक्रीटीकरणाच्या कामकाजादरम्यान मध्यवर्ती बसस्थानक क्र. १ लातूर येथून सुटणाऱ्या पुणे व मुंबई मार्गावरील सर्व फेऱ्या बसस्थानक क्र. २ येथून सुरु होत्या, या सर्व फेऱ्या २६ सप्टेंबर, २०२५ पासून पूर्वे वत मध्यवर्ती बसस्थानक क्र. १ येथून सुरु करण्यात येत आहेत, असे लातूर राज्य परिवहन महामंडळाचे विभाग नियंत्रक यांनी कळविले आहे.

## छोट्या हातांची मोठी कमाल...चिमुकल्यांच्या श्रमातून माझं घरच्या भिंती बोलू लागल्या

**लातूर/प्रतिनिधी :** समाजातील शिक्षणापासून वंचित विद्यार्थ्यांना शिक्षणाची आवड निर्माण होऊन त्यांना सुलभ पद्धतीने शिक्षण घेता यावे. यासाठी औसा तालुक्यातील बुधोडा-वान्जेवाडी येथील माणूस प्रतिष्ठान द्वारा संचलित 'माझं घर' मध्ये विविध उपक्रम राबवण्यात येत असून शरद झरे व संगीता झरे यासाठी पुढाकार घेत आहेत. विद्यार्थ्यांना प्रकल्पामध्ये गांधीजींच्या नई तालीम संकल्पनेवर आधारित स्वावलंबणाचे धडे दिले जातात. गतवर्षी मुलांनी स्वतः तयार केलेल्या आकाश कंदील, उटणे, पणत्या विक्रीतून मिळालेल्या २ लाख रुपय पैशातून प्रकल्पातील भिंतीवर रंगवलेली चित्रे व रेखाटलेल्या माहितीच्या माध्यमातून भिंती बोलक्या झाल्या आहेत. तर विद्यार्थ्यांची शिक्षणात रुची वाढत आहे.

सर्व भिंतींवर विविध विषयांवर आधारित चित्रे रेखाटली आहेत. त्यामुळे विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षण देण्यास मदत झाली आहे. विद्यार्थ्यांना शिकण्यासाठी उपयुक्त



असे पाठ भिंतीवर रंगवले आहेत. विद्यार्थ्यांच्या ज्ञानात भर घालणारी माहिती रेखाटल्याने माझं घरच्या भिंती जणू विद्यार्थ्यांशी बोलू लागल्या आहेत असे चित्र दिसून येते. भिंतीवर तारांगण, चंद्र, सूर्य, आकाशमाला रेखाटली आहेत . तसेच मराठी बाराखडी, मराठी-इंग्रजी महिने, व्याकरण, दिशाज्ञान, गणितीय पाडे, बेरीज-वजाबाकी, गुणाकार-भागाकार, इंग्रजी शब्द, कालमापन, शरीराचे अवयव गिरविण्यात आले आहेत. पर्यावरणीय माहिती, भौगोलिक माहिती, महाराष्ट्र व भारताचा नकाशा, विज्ञान, निसर्गविषयक माहिती, प्राणी-पक्ष्यांची चित्रे काढण्यात आली आहेत. याबरोबरच विद्यार्थ्यांना सांस्कृतिक व संगीत कलेची माहिती व्हावी या उद्देशाने तबला, पेटी, ढोलकी, वीणा यासारखे संगीतवाद्ये रंगवली आहेत. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या ज्ञानामध्ये भर पडत शिक्षणात रुची वाढत आहे. माझं घरच्या भिंती बोलक्या झाल्या असून भिंतींकडे पाहून विद्यार्थी विद्यार्जनात रमून जातात. या उपक्रमाचे सर्वत्र कौतुक होत असून या आगळ्यावेगळ्या बोलक्या भिंती पाहण्यासाठी अनेक मान्यवर वारंवार भेटी देत आहेत.



लातूर येथील संतोषी मातेच्या मंदीरात सौ. नंदा प्रफुल्ल खंडेलवाल यांच्या हस्ते आरती झाली. यावेळी खंडेलवाल परिवार दिसत आहेत.


## टी.सी.हरवली आहे

**सुगरे नागेश माणिकराव या नावाची दयानंद विधी महाविद्यालय लातूरची एलएल.बी. तृतीय वर्षाची टी.सी. नंदी स्टॉप ते मित्र नगर लातूर ऑटो प्रवासात हरवली आहे. कोणास सापडल्यास कळवावे, योग्य बक्षीस दिले जाईल.**

**संपर्क : मो. ८६६९१३९००६**


## युवक हे विकसीत भारताचे अग्रदूत आहेत - प्रा.डॉ.नामदेव काटे

**लातूर/प्रतिनिधी :** विकसित भारत - २०४७ या संकल्पनेचा युवक हाच महत्त्वाचा कणा आहे. विकसीत भारताचे स्वप्न साकार करण्यासाठी युवकांनी विकसित भारत हे फक्त एक स्वप्न नाही तर एक दृढ संकल्प आहे हा निश्चय मनाशी बाळगून सामाजिक समावेशकता, पर्यावरणीय शाश्वतता, प्रभावी प्रशासन, शिक्षण आणि कौशल्य यावर विशेष भर देऊन राष्ट्र उभारणीत अर्थपूर्ण योगदान देणे आवश्यक आहे. देश सेवेस प्रथम प्राधान्य देऊन, आपल्या जाज्वल्य इतिहासाची प्रेरणा घेऊन पूर्ण क्षमतेसह सक्षम बनून विविध क्षेत्रात भारताला जागतिक स्तरावर सर्वोच्च स्थान मिळवून देणारे युवक हे विकसित भारताचे अग्रदूत आहेत.असे प्रतिपादन सुशीलादेवी देशमुख महिला महाविद्यालयाचे ग्रंथपाल प्रा.डॉ.नामदेव काटे यांनी केले.

ते लातूर येथील सरस्वती संगीत कला महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने आयोजित विकसीत भारत - २०४७ या उपक्रमांतर्गत विकसीत भारताच्या वाटचालीत युवकांचे योगदान या विशेष व्याख्यान कार्यक्रमाप्रसंगी प्रमुख मार्गदर्शक म्हणून बोलत होते.

या कार्यक्रमाच्या सुरुवातीला मान्यवरांच्या शुभहस्ते राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या प्रतिमेचे पूजन करून व पुष्पहार अर्पण करून व्याख्यानाचा शुभारंभ करण्यात आला.याप्रसंगी मंचावर संस्थाध्यक्ष प्राचार्य डॉ.राम बोरगावकर,प्र.प्राचार्य डॉ.सुदाम पवार,प्रा.डॉ.नामदेव काटे, राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे कार्यक्रमाधिकारी डॉ.बालाजी शिंदे उपस्थित होते.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.श्रीमंत दोरवे यांनी केले. प्रास्ताविक प्रा.तुकाराम येमले यांनी केले तर उपस्थितांचे आभार प्रा.पांडुरंग गोरे यांनी मानले.

## चंद्रघंटा ..

चंद्र घंटा अवतारी
दुर्गा जागे नवराती
चंद्र कोर मुकूटात
उजळे लक्ष ज्योती

दहाभुजा महादेवी
आयुधे शोभे हाती
सिंहारूढ रुप तुझे
असूरांस महाभिती

रूप तुझे साठवता
स्थिरावली मंदमति
रूप तुझे आठवता
भजन स्तोत्रे रमती

जयघोष उदेउदेचा
संतृप्तेची अनुभूति
महायज्ञ भक्तीयोग
माथीलावा विभूति

कमल पुष्पे हाती
भक्तवर अतिप्रिती
त्रिशूल करारी करी
जातुकासूराचे प्रति

लीन चरणीसाधक
पाठगाती सप्तशती
चंद्र समान शीतला
कृपाळु तू महासती

जाणीव हो अंतरात
महाशक्ती तू पार्वती
अधिक सशक्तनारी
जरी कटु परिस्थिती

**हेमंत मुसरीफ पुणे.**
**९७३०३०६९९६.**

## पथविक्रेत्या करिता ''लोक कल्याण मेळाव्याचे'' आयोजन

### शहरातील पथ विक्रेत्यांनी लाभ घ्यावा मनपा आयुक्त मानसी यांचे आवाहन

**लातूर/प्रतिनिधी :** केंद्र शासनाकडून प्रधानमंत्री पथविक्रेता आत्मनिर्भर निधी योजनेची पुनर्रचना करून सदर योजनेला माहे मार्च २०३० पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. यामुळे शहरातील फेरीवाले , छोटे व्यावसायिक यांना याचा लाभ होणार आहे. आयुक्त मानसी यांच्या आदेशानुसार व उपायुक्त डॉ. पंजाब खानसोळे यांच्या मार्गदर्शनानुसार सदर योजने अंतर्गत दिनांक १७ सप्टेंबर ते दिनांक ०२ ऑक्टोबर २०२५ या कालावधीत '' लोक कल्याण मेळावा'' आयोजित करण्यात येणार आहे. यात नवीन कर्ज प्रस्ताव स्वीकारणे, प्रस्ताव मंजूर करणे, वाटप करणे , फेरीवाले यांचे डिजिटल ओंनबोर्डिंग करणे, फेरीवाले यांचे स्ट्रीट फूड फेरीवाले यांचेसाठी प्रशिक्षण आयोजित करणे हे कामे केली जाणार आहेत. प्रधानमंत्री पथविक्रेता आत्मनिर्भर निधी या योजनेत सुधारणा करून पहिले कर्ज मर्यादा १००००/- रु. वरून १५०००/- रु. , दुसरे कर्ज मर्यादा २००००/- रु. वरून २५०००/- रु. , इतकी वाढविण्यात आली असून तिसरे कर्ज ५००००/- रु. असणार आहे. याशिवाय योजनेचा लाभ घेणारे ज्यांनी दुसरे कर्ज वेळेवर नियमितपणे परतफेड केली आहे अशा लाभार्थ्यांना क्रेडीट कार्ड दिले जाणार आहे. त्यामुळे अचानक उद्भवणाऱ्या व्यवसाय व वैयक्तिक अडचणीसाठी तात्काळ आर्थिक मदत मिळू शकेल. तसेच योजने अंतर्गत फेरीवाले यांना डिजिटल व्यवहारावर मिळणार आहे. त्यामुळे डिजिटल पद्धतीने व्यवसाय करायला प्रोत्साहन मिळेल. याशिवाय शहरातील स्ट्रीट फूड फेरीवाले यांचेसाठी स्वच्छता व अन्न सुरक्षा याबाबत प्रशिक्षण आयोजित करण्यात येणार आहे.

तरी शहरातील जास्तीत जास्त पात्र फेरीवाले यांनी या योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन महानगरपालिका आयुक्त मानसी यांनी केले आहे.


**मध्य रेल्वे**
**विद्युत विभाग**
**विद्युत काम**
**ई-निविदा सूचना**

वरिष्ठ विभागीय विद्युत अभियंता मध्य रेल्वे, सोलापूर (टीआरडी) यांनी मा. भारताच्या राष्ट्रपतींच्या वतीने आणि त्यांच्या वतीने रेल्वे ई-प्रोक्योरमेंट वेबसाइट www.ireps.gov.in वर खालील कामांसाठी प्रतिष्ठित, अनुभवी आणि परवानाधारक विद्युत कंत्राटदारांकडून ऑनलाइन ई-निविदा मागवल्या आहेत. **निविदा क्रमांक:** SUR/TD/T/2025/22. **कामाचे नाव:** इलेक्ट्रिकल टीआरडी भाग सोलापूर विभागातील सोलापूर वाडी विभागात अक्कलकोट रोड स्टेशनवर प्रत्येक दिशेने एक लांब पल्ल्याच्या लूप लाईनच्या तरतुदीशी संबंधित काम **अंदाजे किंमत:**-१,२३,६१,२१५.७०/-, **बोली सुरक्षा:**-२,११,८००/- **काम पूर्णता कालावधी:**-१२ महिने, **ऑफरची वैधता:**-६० दिवस, **वेबसाइटवर निविदा बंद करण्याची तारीख आणि वेळ:**-१७/१०/२०२५ रोजी १५:०० वाजता.

**वरिष्ठ विभागीय विद्युत अभियंता (टीआरडी)**

SUN 77

अपने जानवरों को रेल लाइन से दूर रखे


## जाहीर प्रगटन

जाहीर प्रगटनानुसार नागरिकांना कळविण्यात येते की, खालील यादीप्रमाणे लातूर महानगरपालिका, लातूर प्लॉट घेणाऱ्यांना नामांतरासाठी अर्ज दाखल केले आहे. तरी सदरील नामांतराबाबत नागरिकांना सूचना किंवा हरकती आहेत त्यांना हे प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून सात (७) दिवसाचे आत लातूर महानगरपालिका आयुक्त यांच्याकडे लेखी स्वरूपात नाहरकत दाखल कराव्यात जर कोणतेही हरकती आल्या नाही तर नामांतर मंजूर करून त्याप्रमाणे नाव लावण्याचे कार्यवाही करण्यात येईल.

सिरीयल क्रमांक ५७१-५८५

| अ.क्र. | जागा विक्री करणाऱ्याचे नाव | जागा खरेदी करणाऱ्याचे नाव | सर्वे नंबर | घर क्रमांक | क्षेत्रफळ |
|---|---|---|---|---|---|
| १ | बाबुराव गोविंदराव बोरगावकर | सुरेखा राजेश्वर डांगे | २३/१/अ | A3-2861-15 | १६१४ चौ.मी. |
| २ | जगन्नाथ रंगनाथ शिंदे | मंगलबाई चंद्रकांत कांबळे | ६० | A1-4160 | बेचीपत्राप्रमाणे |
| ३ | मच्छिंद्र सिताराम लोखंडे | विनायक सुदाम गोरे, ओमप्रकाश सुदाम गोरे | ३७/१/अ | A2-2954 | ७५० चौ.फुट |
| ४ | उध्दव सुधाकर काळदाते | रामानंद दत्तु नरवडे पुष्पा गोविंद काळदाते | १७/अ/१ | A3-346 | ९५० चौ.फुट |
| ५ | उत्तम संभाजीराव दोडके | लक्ष्मीबाई उत्तमराव दोडके | ९९२५ | A4-360 | २००० चौ.फुट |
| ६ | सुभाष निवृत्ती मदने | आशिष शुभाष मदने | १०२५९ | A5-3500-1 | ४७३३.३२ चौ.फु. |
| ७ | पद्मीन गोरख सूर्यवंशी | प्रियंका भिमराव सुरवसे | २३८-२ | A5-1951 | ९२८.०५ चौ.फु |
| ८ | बालासाहेब गुलाबराव साळुंके | बालाजी राजेंद्र बंडगर मुक्ता बालाजी बंडगर | ७७/३/ब | A-152-51 | १०२४.७८ चौ.फु. |
| ९ | विजयकुमार विठ्ठलराव लवटे व इतर | हाजी खय्युम अकबर शाह बर्फीवाले व इतर | ७१/१/ब | A1-1918 | १२२.६७ चौ.मी. |
| १० | रामराव भिमराव कस्तुरे | जनाबाई रामराव कस्तुरे व इतर | ७०/ब/३ | A1-2752 | हेअरशिप प्रमाणे |
| ११ | विनोद चंद्रकांत ढगे व इतर | पद्माकर माणिकराव वाघमारे | १४/२/ब | A1-2756-1 | ११०० चौ.फु. |
| १२ | मथुरादास विष्णु कांबळे | सुचिता दामोदर गायकवाड | ५९/२/ब | A1-5864 | १२५० चौ.फु. |
| १३ | राहूल बी. बिराजदार | कविता धनंजय तोडकर | ७०/४/क | A1-3184 | ७६१ चौ.फु. |
| १४ | शेख राफोद्दीन कमरोद्दीन | शेख आयेशा आजमसाब (ल.अ.) सौ. आयेशा अयुबखान पठाण (ल.न.) | -- | A4-465-15 | १०३.४२ |
| १५ | साजिद युनुसखान शेख | शमशाद बेगम अब्दुल व इतर | २२७/४ | A4-465-103 | १४९.१७ स्के.मी. |

स्वाक्षरित/-
**क्षेत्रीय अधिकारी**
**क्षेत्रीय कार्यालय A**
**लातूर शहर महानगरपालिका, लातूर**


Printed and Published by Dayanand Shankar Jade on behalf of Latur Samachar and Printed at Jade Offset Printers Mitra Nagar Latur and Published at Mitra Nagar Latur.
Editor: Dayanand Shankar Jade Mo. 9422472502, RNI 47034/64, POSTAL NO. L2/RNP/OMD 52/24-26

हे पत्रक मुद्रक,प्रकाशक व मालक दयानंद शंकर जडे, यांनी जडे ऑफसेट प्रिंटर्स, मित्रनगर, लातूर (महाराष्ट्र) येथे छापून येथेच प्रकाशित केले आहे. मुख्यसंपादकः दयानंद शंकर जडे मो. ९४२२४७२५०२ आरएनआय ४७०३४/६४, पोस्टल क्र. एल२/आरएनपी/ओएमडी-५२/२४-२६